ePaper
| वर्ष - 9 | अंक -132 | UDYAM-MH-26-0158827 |

# राज्यात हिंदीची सक्ती नाही; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही



महाईन्यूज (TM)

www.mahaenews.com | सोमवार, दि. 5 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- अपमान सहन केला जाणार नाही!
- श्रेयस अय्यर भारतीय संघात पुनरागमन
- उत्तर कोरियाचा अमेरिकेला इशारा
- तुम्हाला जेलमध्ये कोणी पाठवलं?


## मुंबई महापालिका रणधुमाळी: ‘मामूउद्धवजी’ म्हणत फडणवीसांचा हल्लाबोल!

# वचननामा नव्हे, वाचूननामा होता!

## मुख्यमंत्री फडणवीसांकडून ठाकरे बंधूंच्या वचननाम्याची चिरफाड!

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**राज्यातील २९ महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलंच तापलं असून, मुंबई महापालिकेची निवडणूक ही प्रतिष्ठेची लढाई बनली आहे. प्रचारसभांमधून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक सुरू असतानाच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांचा ‘मामूउद्धवजी’ असा उल्लेख करत केलेली टीका सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी मुंबईसाठी संयुक्तपणे जाहीर केलेल्या वचननाम्यानंतर अवघ्याच काही तासांत कांदिवली येथे झालेल्या जाहीर सभेत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर जोरदार शब्दांत टीका केली. “आज जाहीर झालेला दस्तऐवज हा वचननामा नव्हता, तर वाचूननामा होता,” असे म्हणत त्यांनी ठाकरे बंधूंच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले.**



### वचननाम्यावरून फडणवीसांचा टोला

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, “आज सकाळी एक वचननामा जाहीर झाला. मला आश्चर्य वाटतं की काल राजमाता जिजाऊंची जयंती होती, त्या दिवशी हा वचननामा जाहीर करता आला असता. मात्र, सध्या काही लोकांना वंदे मातरमची ॲलर्जी आहे. त्यामुळे कोणत्या दिवशी काय करायचं, हे त्यांचं त्यांनाच ठरवावं लागतं.”

यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांचा उल्लेख करत, “आज आमचे मामू म्हणजे माजी मुख्यमंत्री उद्धवजी आणि नव्याने प्रेम उफाळलेले राजजी यांनी हा वचननामा जाहीर केला. खरं तर वचननामा देण्याचा अधिकार फक्त बाळासाहेब ठाकरे यांनाच होता,” असे सांगत ठाकरे बंधूंवर निशाणा साधला.

### “त्यांनी काय वाचलं, तेही त्यांनाच माहिती नाही”

फडणवीस यांनी ठाकरे बंधूंच्या घोषणांवर शंका व्यक्त करत म्हटले, “आज जाहीर झालेला वचननामा हा वाचूननामा होता. मात्र, त्यांनी काय वाचलं, हेही त्यांना माहिती नाही. गेली २५ वर्षं सत्ता असूनही तेच तेच मुद्दे पुन्हा सांगावे लागत असतील, तर जनाची नाही तर मनाची तरी लाज वाटली पाहिजे.” २०१७ साली दिलेल्या आश्वासनांचा उल्लेख करत फडणवीस म्हणाले की, “एका वृत्तवाहिनीने २०१७ च्या आश्वासनांवर फॅक्ट चेक केला आणि त्या फॅक्ट चेकमध्ये एकही आश्वासन पूर्ण झालं नसल्याचं समोर आलं. मग अशा परिस्थितीत पुन्हा नवीन वचननामा कसा काय?”

### राज यांच्या वक्तव्यावरूनही टोला

यावेळी फडणवीस यांनी राज ठाकरे यांच्या एका जुन्या वक्तव्याचाही समाचार घेतला. “तुम्हाला जेलमध्ये कोणी पाठवलं? आता शिक्षा संपली का?” असा थेट सवाल करत त्यांनी अप्रत्यक्षपणे मनसे प्रमुखांवर टीका केली. यामुळे सभेत एकच खळबळ उडाली.

### उद्धव ठाकरेंचा मोदींवर हल्लाबोल

दरम्यान, याच दिवशी मुंबईत वचननामा जाहीर करताना उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली होती. “आम्ही मुंबईसाठी साधी-सुधी कामं केली. कोस्टल रोड, मध्य वैतरणा, कोरोना काळातील व्यवस्थापन — ही कामं आम्ही केली. पण त्याचं श्रेय भाजप घेत आहे,” असा आरोप त्यांनी केला.

उद्धव ठाकरे म्हणाले, “मोदींनी कैलास पर्वत बांधला, स्वर्गातून गंगा आणली, अरबी समुद्र मिंधे आणि फडणवीसांनी तयार केला — असं का सांगत नाहीत? श्रेय घ्यायचंच असेल तर या कामांचं घ्या.”

### श्रेयवादावरून राजकीय संघर्ष

बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्याच्या उभारणीपासून ते कोस्टल रोडच्या नियोजनापर्यंत सर्व कामांचा श्रेयवाद सध्या राजकीय वादाचा मुद्दा ठरत आहे. उद्धव ठाकरे यांनी, “रिगलजवळ बाळासाहेबांचा पुतळा उभारण्याची जागा मी निवडली, खर्चही आम्ही केला. तरीही श्रेय दुसरे घेत आहेत,” असा आरोप केला.

### निवडणूक ‘हाय व्होल्टेज’

मुंबई महापालिका निवडणूक ही यंदा केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक न राहता, नेतृत्व, विश्वासार्हता आणि हिंदुत्वाच्या राजकारणाची लढाई बनली आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्याने विरोधकांची ताकद वाढली असली, तरी महायुतीकडून आक्रमक प्रचार सुरू आहे. ‘मामूउद्धवजी’, ‘वाचूननामा’, ‘२५ वर्षांची अपयशाची यादी’ अशा शब्दांनी प्रचार अधिकच धारदार झाला असून, पुढील काही दिवसांत हा राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हं आहेत.

## विकास विरुद्ध विश्वास आणि कामगिरी विरुद्ध घोषणाबाजी

एकीकडे ठाकरे बंधू भाजपवर श्रेय लाटल्याचा आरोप करत आहेत, तर दुसरीकडे मुख्यमंत्री फडणवीस ठाकरे बंधूंच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत विकास विरुद्ध विश्वास आणि कामगिरी विरुद्ध घोषणाबाजी असा थेट सामना रंगताना दिसत असून, येत्या काळात मतदार कोणाच्या बाजूने कौल देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ‘दोन युवराजांचा शो, करप्शन–कन्फ्यूजची युती!’

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे आणि मनसे नेते अमित ठाकरे यांच्यावर नाव न घेता जोरदार टीका केली आहे. कांदिवलीतील जाहीर सभेत बोलताना फडणवीस यांनी ठाकरे कुटुंबाच्या नेतृत्वावर आणि त्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. “आज त्या ठिकाणी दोन युवराज कुठला तरी शो करत होते. राहुल गांधींसारखी स्क्रिन लावली होती, राहुल गांधींसारख्या येरझऱ्या करत होते, काही तरी बोलत होते,” असे म्हणत फडणवीस यांनी थेट टोला लगावला. मुंबईत चांगल्या प्रकारची शौचालये नसल्याचा मुद्दा उपस्थित केल्यावर फडणवीस म्हणाले, “हे आम्हाला का विचारता? घरी जाऊन काका किंवा बाबांना विचारा. २५ वर्षांमध्ये मुंबईत शौचालये का तयार झाली नाहीत, याचं उत्तर आम्ही द्यायचं की त्यांनी द्यायचं?” आज जाहीर झालेल्या वचननाम्यावरही त्यांनी तीव्र टीका केली. “आज जो वचननामा आला आहे, त्यात ना वचन आहे ना नाव. तो फक्त लोकांना गोंधळात टाकणारा कागद आहे,” असा आरोप फडणवीस यांनी केला.

## पुणे महापालिका निवडणूक

## बाळासाहेब अमराळे राष्ट्रवादीत प्रवेश करणार

# पुण्यात भाजपला धक्का?

## अमराळे यांच्यावर मोठा अन्याय

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पुणे महापालिका निवडणुकीत भाजपने अनेक निष्ठावंताना उमेदवारी दिली नाही. त्यामुळे काही जणांनी दुसऱ्या पक्षात प्रवेश करुन उमेदवारी मिळवली. अशातच आता पुण्यात भाजपला आणखी एक धक्का बसण्याची शक्यता आहे. गेली २५ वर्ष भाजपा मधे विविध पदांवर कार्यरत असलेले व स्वतःच्या वेगवेगळ्या उपक्रमांमधून स्वतःची ओळख निर्माण करणारे पुणे शहर भाजप माजी उपाध्यक्ष वसंत उर्फ बाळासाहेब अमराळे राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याची खात्रीलायक माहिती त्यांच्या समर्थकांकडून मिळाली आहे.**



अमराळे यांनी २०१२ मधे महापालिका निवडणूक लढवली होती. काही मताने त्यांचा पराभव झाला होता. तेंव्हापासून त्यांना महानगरपालिका व विधानसभेसाठी भाजपकडून डावलले आहे. २०२६ च्या निवडणुकीत सुद्धा त्यांना प्रभाग १२ (छ शिवाजीनगर मॉडेल कॉलनी) मधे त्यांना डावलण्यात आले आहे. या ठिकाणी सर्वसाधारण गटात महिला उमेदवार देवून अमराळे यांच्यावर मोठा अन्याय केला गेला आणि हे सर्व एका नेत्याने जाणीवपूर्वक घडवून आणले असल्याची भावना त्यांच्या समर्थकांनी व्यक्त केली आहे.

गेली २५ वर्ष सातत्याने या भागात त्यांनी देश – परदेशात ५५ यात्रांचे आयोजन केलेले आहे. त्यातून ३५००० नागरिकांनी देवदर्शनाचा लाभ घेतला आहे. मोठ्या संख्येने हळदी कुंकू, रक्षाबंधन, कोजागिरी असे समारंभ, विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच ३००० हून अधिक नागरिकांना व पोलिस बांधवांना वेगवेगळ्या पुरस्काराने त्यांनी सन्मानित केले आहे. पालखी मार्गावर निर्मल वारी अभियान यशस्वी करण्यात त्यांचा मोठा सहभाग राहिला आहे. दैनंदिन नागरिकांच्या अडचणी सोडवत असल्याने आणि नम्र व प्रेमळ स्वभावामुळे त्यांची मोठी लोकप्रियता या भागात असल्याचे दिसून येते. यामधून स्वतःची मोठी वोट बँक त्यांनी निर्माण केलेली आहे. अमराळे यांच्या या निर्णयाने प्रभाग १२ च्या निकालावर परिणाम होवू शकतो हे लक्षात आल्याने राष्ट्रवादी पक्षाकडून त्यांना पक्षात घेण्यासाठी मुख्य नेत्यांकडून मोठे प्रयत्न होत असल्याची माहिती समोर आली आहे. येत्या १० तारखेला हा पक्ष प्रवेश होवू शकतो असेही अमराळे यांच्या समर्थकांकडून सांगण्यात येत आहे. अमराळे यांना याबाबत संपर्क केला असता त्यांनी २ दिवसात याबाबत माझी भूमिका विस्तृतपणे जाहीर करेल असे त्यांनी सांगितले.अमराळे यांनी २०१२ मधे महापालिका निवडणूक लढवली होती. काही मताने त्यांचा पराभव झाला होता. तेंव्हापासून त्यांना महानगरपालिका व विधानसभेसाठी भाजपकडून डावलले आहे. २०२६ च्या निवडणुकीत सुद्धा त्यांना प्रभाग १२ (छ शिवाजीनगर मॉडेल कॉलनी) मधे त्यांना डावलण्यात आले आहे. या ठिकाणी सर्वसाधारण गटात महिला उमेदवार देवून अमराळे यांच्यावर मोठा अन्याय केला गेला आणि हे सर्व एका नेत्याने जाणीवपूर्वक घडवून आणले असल्याची भावना त्यांच्या समर्थकांनी व्यक्त केली आहे. मोठ्या संख्येने हळदी कुंकू, रक्षाबंधन, कोजागिरी असे समारंभ, विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच ३००० हून अधिक नागरिकांना व पोलिस बांधवांना वेगवेगळ्या पुरस्काराने त्यांनी सन्मानित केले आहे.

### प्रभाग १२ च्या निकालावर परिणाम

दैनंदिन नागरिकांच्या अडचणी सोडवत असल्याने आणि नम्र व प्रेमळ स्वभावामुळे त्यांची मोठी लोकप्रियता या भागात असल्याचे दिसून येते. यामधून स्वतःची मोठी वोट बँक त्यांनी निर्माण केलेली आहे. अमराळे यांच्या या निर्णयाने प्रभाग १२ च्या निकालावर परिणाम होवू शकतो हे लक्षात आल्याने राष्ट्रवादी पक्षाकडून त्यांना पक्षात घेण्यासाठी मुख्य नेत्यांकडून मोठे प्रयत्न होत असल्याची माहिती समोर आली आहे.

## पक्षाने एकनिष्ठ कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवला

## जावई–सासरे यांच्यात उमेदवारीवरुन नखातेंच वक्तव्य

।पिंपरी।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २७ मधून भाजपची उमेदवारी कोणाला मिळणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले होते. स्थानिक राजकारणात या प्रभागाबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू होती. अखेर भाजपने प्रभाग क्रमांक २७ मधून चंद्रकांत नखाते यांना उमेदवारी जाहीर केली आहे. यावेळी बोलताना चंद्रकांत नखाते म्हणाले की, पक्षाने एकनिष्ठ आणि सातत्याने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर विश्वास दाखवला आहे.**



हा सच्च्या कार्यकर्त्याचा विजय असून, अख्खा पॅनल निवडून आणण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.चंद्रकांत नखाते हे १९९७ पासून राजकारणात सक्रिय आहेत. १९९७ मध्ये त्यांच्या पत्नी नगरसेविका होत्या. त्या काळापासून राहटणी परिसराच्या विकासाला सुरुवात झाली असून, प्रभाग क्रमांक २७ मध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली असल्याचा दावा त्यांनी केला.लोकशाहीमध्ये प्रत्येकाला उमेदवारी मागण्याचा अधिकार आहे. मात्र, प्रभागातून कोणाचा विजय होऊ शकतो याचा सर्व्हे तयार केल्यानंतर पक्षाने माझ्यावर जबाबदारी सोपवली, असे नखाते यांनी स्पष्ट केले. पॅनलमधील सर्व उमेदवार विजयी होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केलादरम्यान, चंद्रकांत नखाते यांचे जावई राज तापकीर हे देखील भाजपकडून प्रभाग क्रमांक २७ मधून उमेदवारीसाठी इच्छुक होते.कुटुंबातील दोन उमेदवारांना उमेदवारी देणे शक्य नसल्याने पक्षाने चंद्रकांत नखाते यांना संधी दिली. या उमेदवारीवरून दोन्ही कुटुंबांमध्ये कोणतीही कटुता निर्माण होऊ नये, यासाठी दोन्ही बाजूंनी समंजस भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही स्थानिक कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

### प्रत्येकाला उमेदवारीचा अधिकार

हा सच्च्या कार्यकर्त्याचा विजय असून, अख्खा पॅनल निवडून आणण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.चंद्रकांत नखाते हे १९९७ पासून राजकारणात सक्रिय आहेत. १९९७ मध्ये त्यांच्या पत्नी नगरसेविका होत्या. त्या काळापासून राहटणी परिसराच्या विकासाला सुरुवात झाली असून, प्रभाग क्रमांक २७ मध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली असल्याचा दावा त्यांनी केला.लोकशाहीमध्ये प्रत्येकाला उमेदवारी मागण्याचा अधिकार आहे. मात्र, प्रभागातून कोणाचा विजय होऊ शकतो याचा सर्व्हे तयार केल्यानंतर पक्षाने माझ्यावर जबाबदारी सोपवली, असे नखाते यांनी स्पष्ट केले.

## बिनविरोध निवडीबद्दल मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन भाजप नगरसेवक रवी लांडगे यांची

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी भेट!

## पिंपरी-चिंचवडच्या विकासावर सविस्तर चर्चा; शहराचा विकास आलेख उंचावता ठेवण्याची ग्वाही

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ मधून बिनविरोध निवडून आलेले भाजप नगरसेवक रवी लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईतील वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाबाबत सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाली.**




> “मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या भेटीत आगामी काळातील विकास प्रकल्प, महापालिका व राज्य सरकार यांच्यातील समन्वय आणि नागरिकाभिमुख प्रशासन याबाबतह चर्चा झाली. पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रगतीसाठी राज्य सरकारच्या धोरणांशी सुसंगत काम करत राहण्याचा निर्धार मी व्यक्त केला आहे.
>
> **–रवी लांडगे,** नगरसेवक प्रभाग क्रमांक 6 भोसरी.

या भेटीत नगरसेवक रवी लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड शहराचा विकास आलेख कायम उंचावता ठेवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांना दिली. शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी तसेच नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### विकासकामांना अधिक गती देण्यावर भर

या चर्चेदरम्यान शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज व्यवस्था, शिक्षण, आरोग्य सेवा आणि नागरी सोयीसुविधा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक विस्तार लक्षात घेता भविष्यातील विकास प्रकल्पांची योग्य आखणी करणे आवश्यक असल्याचे रवी लांडगे यांनी नमूद केले. पिंपरी-चिंचवड शहर हे औद्योगिक, शैक्षणिक आणि आयटी क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र असून, येथे आधुनिक आणि नागरिकाभिमुख सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य सरकारच्या सहकार्याने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन आणि मार्गदर्शन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रवी लांडगे यांच्या बिनविरोध निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले. पिंपरी-चिंचवड शहर हे राज्याच्या आर्थिक प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी सांगितले.

“शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, महापालिका प्रशासन आणि राज्य सरकार यांच्यात सुसंवाद आणि समन्वय आवश्यक आहे. नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणारे आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन काम करणे महत्त्वाचे आहे,” असे मार्गदर्शन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

### राज्य व महापालिकेतील समन्वयावर चर्चा

या भेटीत आगामी काळातील विविध विकास प्रकल्प, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि राज्य सरकार यांच्यातील समन्वय, तसेच नागरिकाभिमुख प्रशासन कसे अधिक प्रभावी करता येईल यावरही सविस्तर चर्चा झाली. राज्य सरकारच्या धोरणांशी सुसंगत राहून विकासकामे राबवण्यावर भर देण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नगरसेवक रवी लांडगे यांची ही भेट पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात असून, या चर्चेमुळे शहराच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

# आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वावर विश्वास

## मिशन-PCMC: विदर्भ मित्र मंडळाचा भारतीय जनता पार्टीला जाहीर पाठिंबा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी येथील आळंदी रोडवरील दुर्वांकुर लॉन्स येथे विदर्भ मित्र मंडळाच्या वतीने आयोजित फॅमिली गेट-टुगेदर व स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनातून विदर्भवासीयांनी आमदार महेश लांडगे यांच्या सक्षम व विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भारतीय जनता पार्टीला जाहीर पाठिंबा दिला.**




> “पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने भक्कम व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व दिले आहे. रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांसाठी त्यांनी नेहमीच ठाम भूमिका घेतली. विदर्भवासीयांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि रोजगाराच्या प्रश्नांबाबतही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यामुळे विदर्भ मित्र मंडळाच्या वतीने आम्ही आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीला जाहीर आणि बिनशर्त पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ५ सह संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात भाजपाचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, यासाठी विदर्भवासीय एकजुटीने कार्य करतील.”
>
> **–कविता भोंगाळे,** उमेदवार, भाजपा, प्रभाग- 5.

या कार्यक्रमास कामगार नेते सचिन लांडगे व उद्योजक कार्तिक लांडगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच, प्रभाग क्रमांक ५ मधील इच्छुक उमेदवार अनुराधा गोफणे, सागर गवळी, कविता भोंगाळे व जालिंदर शिंदे यांनी उपस्थित राहून नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी उपस्थित विदर्भवासीयांनी प्रभाग क्रमांक ५ सह संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात भाजपाच्या उमेदवारांना एकमुखी व बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली शहरात सुरू असलेली विकासकामे, संघटनात्मक ताकद व सर्वसामान्यांशी असलेला थेट संवाद यामुळेच ही भूमिका घेण्यात आल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहिल्याने परिसरात राजकीय चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. या स्नेहसंमेलनामुळे विदर्भवासीयांचे सामाजिक ऐक्य अधिक बळकट झाले असून ‘मिशन-PCMC’ अंतर्गत भाजपाच्या संघटनात्मक मजबुतीला नवी ऊर्जा मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

याप्रसंगी कविता भोंगाळे म्हणाल्या की, “आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड शहरात सातत्याने विकासाची कामे होत आहेत. विदर्भवासीयांच्या प्रश्नांना न्याय देणारे नेतृत्व म्हणून आम्हाला त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला भक्कम पाठिंबा देण्याचा निर्णय आम्ही एकमताने घेतला आहे.”



**भूमिका**

# बेरोजगारी - एक भीषण समस्या

**आज भारतात शिक्षणाचा विस्तार झाला आहे. पदव्या वाढल्या आहेत, तरुण अधिक प्रशिक्षित वाटतात, अपेक्षा मोठ्या आहेत. पण त्याच वेळी नोकऱ्यांची संख्या, गुणवत्ता आणि सुरक्षितता याबाबत अनिश्चितता वाढली आहे. सरकारी नोकऱ्या कमी होत चालल्या आहेत, खासगी क्षेत्रात स्थैर्य नाही, आणि गिग इकॉनॉमीच्या नावाखाली अस्थायी कामांना रोजगार म्हणून मांडलं जात आहे.**

आकडेवारीच्या पातळीवर हे "रोजगार" वाटू शकतो, पण प्रत्यक्षात ते असुरक्षिततेचं दुसरं नाव आहे. बेरोजगारी आज केवळ "नोकरी नाही" इतकी सोपी समस्या राहिलेली नाही.भारतीय राजकारणात "विकास" हा शब्द इतका वारंवार वापरला जातो की तो आता स्वतःचं अर्थ हरवू लागला की काय असं वाटायला लागलंय. रस्ते, पूल, विमानतळ, मेट्रो, आकडे आणि मोठ्या प्रकल्पांची यादी या सगळ्यांमधून एक यशस्वी राष्ट्र उभं राहत असल्याचं चित्र रंगवलं जातं. पण या झगमगाटाच्या मागे एक शांत, खोल आणि अस्वस्थ करणारी वस्तुस्थिती दडलेली आहे. ती म्हणजे बेरोजगारी. विकासाच्या घोषणांच्या सावलीत रोजगाराचा प्रश्न मागे पडतो आहे, आणि हीच बाब आज भारतासाठी सर्वात मोठा धोका ठरत आहे. विकासाची सध्याची मांडणी भौतिक पायाभूत सुविधांभोवती फिरते. किती किलोमीटर महामार्ग बांधले,



किती प्रकल्प मंजूर झाले, किती गुंतवणूक आली, हे सगळं मोजलं जातं. पण या सगळ्या प्रक्रियेत एक मूलभूत प्रश्न मात्र विचारला जात नाही. तो म्हणजे या विकासामुळे किती टिकाऊ नोकऱ्या निर्माण झाल्या? आणि ज्या झाल्या, त्या कोणासाठी? आज भारतात शिक्षणाचा विस्तार झाला आहे. पदव्या वाढल्या आहेत, तरुण अधिक प्रशिक्षित वाटतात, अपेक्षा मोठ्या आहेत. पण त्याच वेळी नोकऱ्यांची संख्या, गुणवत्ता आणि सुरक्षितता याबाबत अनिश्चितता वाढली आहे. सरकारी नोकऱ्या कमी होत चालल्या आहेत, खासगी क्षेत्रात स्थैर्य नाही, आणि गिग इकॉनॉमीच्या नावाखाली अस्थायी कामांना रोजगार म्हणून मांडलं जात आहे. आकडेवारीच्या पातळीवर हे "रोजगार" वाटू शकतो, पण प्रत्यक्षात ते असुरक्षिततेचं दुसरं नाव आहे. बेरोजगारी आज केवळ "नोकरी नाही" इतकी सोपी समस्या राहिलेली नाही. ती मानसिक, सामाजिक आणि राजकीय समस्या बनली आहे. तरुणाई दीर्घकाळ तयारी करते, परीक्षा देते, मुलाखती देते, आणि शेवटी अपयशाच्या वर्तुळात अडकते. या प्रक्रियेत आत्मविश्वास झिजतो, कौटुंबिक ताण वाढतो, आणि समाजात निराशा पसरते.

पण या निराशेचा आवाज घोषणांच्या गदारोळात दबला जातो. राजकीय भाषेत बेरोजगारीवर बोलणं टाळलं जातं, कारण तो अस्वस्थ करणारा विषय आहे. विकासाची कथा उत्साही असते, बेरोजगारीची कथा प्रश्न विचारणारी असते. विकासाचे प्रकल्प मोठेपण दाखवतात. बेरोजगारी मात्र उत्तरदायित्व मागते. त्यामुळेच बेरोजगारीवर चर्चा कमी आणि विकासाच्या घोषणांचा मारा अधिक दिसतो. आणखी एक गंभीर बाब म्हणजे, रोजगारनिर्मितीची गुणवत्ता. जे रोजगार निर्माण होत आहेत, ते बहुतेक वेळा कमी वेतनाचे, अस्थायी आणि सामाजिक सुरक्षेशिवाय असतात. करारावरची कामं, तात्पुरते प्रकल्प, आउटसोर्सिंग या सगळ्यामुळे रोजगाराचा आकडा वाढल्यासारखा दिसतो, पण कामगाराचं आयुष्य अधिक अस्थिर होतं. विकास जर रोजगार देत नसेल, किंवा देत असलेला रोजगार माणसाला सुरक्षित भविष्य देत नसेल, तर तो विकास कोणासाठी आहे, हा प्रश्न अपरिहार्य ठरतो. ग्रामीण आणि शहरी भारतातील दरीही इथे स्पष्ट दिसते. शेतीतून बाहेर पडणाऱ्या तरुणांसाठी शहरात पुरेशा नोकऱ्या नाहीत. उद्योग येतात, पण ऑटोमेशनमुळे रोजगार मर्यादित राहतो. कौशल्य प्रशिक्षणाच्या योजना जाहीर होतात, पण त्या बाजाराच्या गरजांशी जुळतातच असं नाही. परिणामी, प्रशिक्षण घेतलेले तरुणही बेरोजगार राहतात. या सगळ्याचा परिणाम राजकीय पातळीवर दिसायला वेळ लागतो, पण तो परिणाम खोलवरचा असतो. बेरोजगार तरुण हा अस्वस्थ नागरिक असतो. तो व्यवस्थेवर प्रश्न विचारतो, कधी उदासीन होतो, कधी टोकाच्या विचारांकडे वळतो. लोकशाहीसाठी ही परिस्थिती धोकादायक असते. कारण रोजगार हा केवळ आर्थिक प्रश्न नाहीय.

## प्रासंगिक »

### इराणमधील उद्रेक !

***इराणमध्ये पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात निदर्शने होत आहेत.***

नेपाळ, श्रीलंका, बांगला देशानंतर आता इराणमध्येही लोक रस्त्यावर उतरले आहेत. नेपाळ, फ्रान्ससारखी जन झेड रस्त्यावर उतरून आपल्याच सरकारला आव्हान द्यायला लागली आहे. राजधानीच्या मुख्य ग्रँड बाजाराभोवतीही निदर्शने झाली. निदर्शकांनी सरकारविरोधी घोषणाबाजी केली. व्यापारी आणि दुकानदारांनी तेहरानच्या मध्यभागी सादी स्ट्रीटवर आणि राजधानीच्या मुख्य ग्रँड बाजाराजवळील शुश परिसरात मोर्चा काढला.

इराणच्या चलनाच्या आतापर्यंतच्या नीचांकी घसरणीनंतर आणि देशाच्या मध्यवर्ती बँकेचे प्रमुख मोहम्मद रेझा फरझान यांनी राजीनामा दिल्याच्या वृत्तानंतर ही निदर्शने झाली. निदर्शकांना शांत करण्याचा प्रयत्न करताना, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी हा लोकांच्या जीवनमानाचा हा रोजचा प्रश्न आहे आणि निदर्शकांच्या मागण्यांना वैध म्हटले आहे. त्यांनी इराणच्या गृहमंत्र्यांना निदर्शकांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून त्यांच्या न्याय्य मागण्या ऐकण्याचे निर्देश दिले आहेत.

प्रदूषण हा एक बहुपदरी विषय आहे. प्रदूषण कमी करावयाचे झाल्यास त्यात वाहतूक, बांधकामे, कचरा जाळणे आणि स्मशानभूमी या गोष्टी लक्षात घ्यावयास हव्यात. कोणत्याही शहरातील हवेची गुणवत्ता तेथील वायू गुणवत्ता निर्देशांकावर म्हणजेच 'एक्यूआय'वर ठरते. हा साधासोपा आकडा असतो.

# पुणे: स्वच्छ हवा हा नागरिकांचा अधिकार

आणि तो नागरिकांना सहजपणे समजतो. आठ ते दहा प्रदूषकांचे एकत्रित मोजमाप करून हा निर्देशांक ठरविला जातो.प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकांच्या उपाययोजना अपुऱ्या आहेत. प्रदूषण कमी करण्यासाठी रस्त्यांवरील खासगी वाहनांची संख्या सर्वप्रथम कमी करावी लागेल. हे घडण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी लागेल. याकडे महापालिका किती लक्ष देते? कोणतीही सार्वजनिक वाहतूक नफा कमावण्यासाठी नसते. जनतेसाठी सुविधा हाच तिचा मुख्य उद्देश असतो. प्रदूषण कमी करण्यासाठी खासगी वाहनांची संख्या कमी करावी लागेल. हे करण्यासाठी नागरिकांनी खासगी वाहन वापरू नये, यासाठी प्रयत्न करावे लागतील. त्यात वाहनतळ शुल्क वाढवावे लागेल. पण, लोक नाराज होतील, या भीतीने अशा उपाययोजनांकडे दुर्लक्ष केले जाते. शहरातील वायू प्रदूषणाची समस्या राजकारण्यांना समजावून सांगण्याचा



प्रयत्न स्वयंसेवी संस्थांकडून केला जातो. मात्र, त्यांच्याकडून त्याला प्राधान्य दिले जात नाही. लोकानुनयी विषयांना राजकारण्यांकडून महत्त्व दिले जाते. त्यात केवळ दृश्य स्वरूपातील म्हणजेच लोकांना दिसतील अशी कामे असतात. प्रदूषण हा थेट नागरिकांच्या आरोग्याशी निगडित मुद्दा आहे. त्या अंगाने त्याकडे राजकारणी पाहत नाहीत. याबाबत त्यांच्यात सजगता दिसून येत नाही. शहरातील वायू प्रदूषण प्रामुख्याने वाहने, बांधकामे, कचरा जाळणे या गोष्टींमुळे होते. आता या गोष्टी कमी करण्यासाठी आपण काय पावले उचलत आहोत? प्रदूषण कमी करण्यासाठी प्रशासनाकडून दीर्घकालीन उपाययोजना होत नाहीत. प्रदूषण कमी करायचे म्हणजे नेमके काय करायचे, याबाबत गोंधळाची परिस्थिती आहे. केवळ झाडे लावली म्हणजे प्रदूषण कमी होणार नाही. प्रदूषणाचे स्रोत शोधून तेथून ते कमी करावे लागेल.शहरातील प्रदूषणात वाढ झाल्यास महापालिका नागरिकांना लघुसंदेशाद्वारे आरोग्य सल्ला पाठवू शकते. त्यात नागरिकांना हवा गुणवत्ता निर्देशांक आणि त्यामुळे आरोग्यावर होणारा परिणाम याबाबत माहिती देता येईल. यातून नागरिकांमध्ये प्रदूषणाबाबत जागरुकता निर्माण होईल. यासारख्या साध्या उपाययोजनाही महापालिकांच्या पातळीवर होताना दिसत नाहीत. आणि तो नागरिकांना सहजपणे समजतो. आठ ते दहा प्रदूषकांचे एकत्रित मोजमाप करून हा निर्देशांक ठरविला जातो.प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकांच्या हे घडण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी लागेल. याकडे महापालिका किती लक्ष देते?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

निवडणुका पुन्हा घ्या! नार्वेकर यांचे विधानसभाध्यक्षपदावरून निलंबन करा

# बिनविरोध निवडणूक हा लोकशाहीचा अपमान!

## उद्धव ठाकरे यांची मागणी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशातील लोकशाही संपून आता झुंडशाही सुरू झाली आहे. राज्यात कल्याण-डोंबिवली, ठाण्यासह बिनविरोध निवडणुकांची सुरू झालेली प्रक्रिया ही लोकशाहीचा अपमान करणारी असल्याचे सांगताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मतदानापासून मतदारांना वंचित ठेवले जात असल्याने निवडणुका रद्द करून पुन्हा घेण्यात याव्यात अशी मागणी केली. विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अधिकारांचा दुरुपयोग केला असल्याबद्दल संताप व्यक्त करताना त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून अध्यक्षपदावरून निलंबन करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली.**




शिवसेना भवन येथे शिवसेना (ठाकरे), महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांचा संयुक्त वचननामा प्रकाशित करण्यात आला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी बिनविरोध निवडणुकांबद्दल संतप्त प्रतिक्रिया देताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निवडणूक प्रक्रियेतील हस्तक्षेपाबाबत नाराजी व्यक्त केली. भाजपची मतचोरी पकडल्यानंतर त्यांनी आता उमेदवारांची पळवापळवी सुरू केली आहे. बिनविरोध निवडणुकीची प्रक्रिया ते राबवत आहेत.साम, दाम, दंड, भेद म्हणजे एवढे निगरगट्ट आणि कोडगे राज्यकर्ते याआधी महाराष्ट्राला कधीही लाभले नसल्याची टीका त्यांनी केली. विधानसभा अध्यक्षांचा अधिकार सभागृहात, बाहेर ते राहुल नार्वेकर आणि आमदार आहेत. एक आमदार आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून जनतेला दमदाटी करत आहे आणि संरक्षण काढून घेण्याचा आदेश स्वत: संरक्षणात राहून देत आहे, ही बाब आयोगाने गांभीर्याने घेऊन त्यांचे अध्यक्षपदावरू तत्काळ निलंबन करायलो. जनतेचे न्यायासन म्हणजे विधानसभा अध्यक्ष असतात. त्यांनी निष्पक्षपणे कारभार करण्याची जबाबदारी आहे. पण त्याला छेद देणारे वर्तन राहुल नार्वेकर यांचे आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी ठाकरे यांनी केली.मुंबईचा महापौर मराठी व हिंदू होणार या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याचाही त्यांनी समाचार घेतला. भाजप मराठी माणसाला हिंदू समजत नाही का, असा सवाल करताना आम्ही मराठी आहोत आणि अस्सल हिंदूच आहोत. आतापर्यंत शिवसेनेनेच मराठीच महापौर दिले आहेत. मात्र, भाजप शिवसेनेसोबत सत्तेत असताना उपमहापौर कोण केले होते, हे त्यांनी सांगावे असा टोला लगावताना भाजपने मुंबई महापालिकेवर अमराठी उपमहापौर दिल्याची आठवण करून दिली.मुख्यमंत्री फडणवीस यांनी महापालिकेच्या ठेवी चाटायला नसतात या वक्तव्याचाही त्यांनी समाचार घेतला. हे वक्तव्यच अशोभनीय असल्याचे सांगताना ठेवी या चाटायला नसतात. पण कान्ट्रॅक्टरचे बुट चाटून त्यांना वाटायलाही नसतात, असा टोला त्यांनी लगावला. यावेळी भाजपने महापालिकेची विल्हेवाट लावायचे ठरवले असल्याची टीका त्यांनी केली. जमाखर्चाचा ताळमेळ साधून खर्च केला जातो. आपल्याकडे असलेली साधने आणि किती महसूल येणार याचा अभ्यास असतो. जिथे मुंबई महापालिकेचा १५ हजार कोटींचे अर्थसंकल्पीय खर्चाची तरतूद आहे तिथे यांनी तीन लाख कोटींची देणी करून ठेवली आहेत. हा तीन लाख कोटींचा घोटाळा असल्याचे ठाकरे म्हणाले.मुख्यमंत्री असताना मराठी रंगभूमीचे दालन करणार होतो.विकासकाच्या घशात घातले. वरळी डेअरीतील कामगारांचे तिथेच पुनर्वसन करून तिथे पर्यटन केंद्र करणार होतो.

### ठाकरे बंधूंचा हल्लाबोल

मराठी भाषा भवन, कचऱ्यासाठी क्षेपणभूमी करणार होतो ती रद्द केली. मुंबईतील सर्व जमीन अदानीच्या घशात घातली जात आहे. उद्या भाजपाचा महापौर झाला तर मुंबईचं अदानीस्तान होईल, असा दावा उद्धव ठाकरे यांनी केला.आम्ही केलेल्या कामांचे श्रेय चोरणारी अबोध बालकांची टोळी' या मुख्यमंत्री फडणवीस यांच्या टीकेला उत्तर देताना आम्ही मुंबईसाठी खूप छोट्या गोष्टी केल्या त्याचे श्रेय तुम्ही का घेता.

# तुम्हाला जेलमध्ये कोणी पाठवलं?

## मुख्यमंत्र्यांची राज ठाकरेंच्या 'त्या' वक्तव्यावरून टीका

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी आज वचननामा जाहीर केला. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे तब्बल २० वर्षांनी शिवसेना भवनात आले होते. त्यावरून बोलताना २० वर्ष झाले, आता जेलमधून बाहेर आल्यासारखं वाटतंय, असं राज ठाकरेंनी म्हटलं होतं.**



त्यांच्या या वक्तव्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांदिवलीतील सभेत बोलताना खोचक टीका केली.'तुम्हाला जेलमध्ये कोणी पाठवलं होतं? कोणत्या गुन्ह्यात जेलमध्ये गेला होतात? आता शिक्षा संपली का?', असं म्हणत फडणवीस यांनी राज ठाकरेंवर टीका केली. आज राज ठाकरे म्हणाले की २० वर्ष झाले, आता जेलमधून बाहेर आल्यासारखं वाटतंय, म्हणजे मातोश्रीवरून शिवतीर्थावर गेले, मग शिवतीर्थ जेल समजायचं का? बरं, तुम्हाला जेलमध्ये कोणी पाठवलं? हे तरी सांगितलं पाहिजे. तुम्ही कोणत्या गुन्ह्यात जेलमध्ये गेला होतात? मग आता शिक्षा संपली का? खरं म्हणजे आज अनेक लोकांनी पाहिलं की राज ठाकरे यांची बॉडी लँग्वेज लक्षात येत नव्हती. काही जमत नव्हतं. नेहमी सारखे राज ठाकरे वाटत नव्हते. मी तुम्हाला या पूर्वीच सांगितलेलं आहे, आमच्या अमित साटम यांनी देखील म्हटलं होतं की हा प्रीतिसंगम नाही, हा भिती संगम आहे", अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरेंवर केली. आज सकाळी एक वचननामा जाहीर झाला. मला आश्चर्य वाटतं की, काल आई जिजाऊंची जयंती होती. कालही हा वचननामा जाहीर करता आला असता. मात्र, अलिकडच्या काळात ज्यांना वंदे मातरमची ॲलर्जी आहे अशा काही लोकांबरोबर आमचे काही जुने मित्र बसायला लागले आहेत. त्यामुळे त्यांना आता कशा कशाची ॲलर्जी होते, हे मला सांगण्याची गरज नाही. आज आमचे मामू, मामू म्हणजे माजी मुख्यमंत्री, आमचे मामू उद्धवजी आणि नव्याने प्रेम उफाळलेले राजजी, यांनी आज एक वचननामा जाहीर केला. पहिल्यांदा तर मी एक सांगतो की वचननामा देण्याचा अधिकार हा फक्त बाळासाहेब ठाकरे यांनाच होता. आज जाहीर झालेला वचननामा नव्हता, तर तो वाचूननामा होता, तरीही त्यांनी काय वाचलं त्यांनाही माहिती नाही", अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर केली. एका वृत्तवाहिनीने २०१७ च्या यांच्या (उद्धव ठाकरे यांच्या) आश्वासनांच्या संदर्भात एक फॅक्ट चेकचा रिपोर्ट केला.

### 'झूठों ने झूठों से कहा सच बोलो

त्या फॅक्ट चेकमध्ये यांनी २०१७ मध्ये जे आश्वासने दिले होते, त्यातील एकही आश्वासन त्यांना पूर्ण करता आलं नाही असं समोर आलं. आता हे जेव्हा वचननामा प्रसिद्ध करण्यासाठी बसले होते तेव्हा ते एकमेकांमध्ये काहीतरी बोलत होते. मग मी माहिती काढली तर ते त्या ठिकाणी काय बोलत असतील? 'झूठों ने झूठों से कहा सच बोलो.

## सार्वभौमत्वाचं गंभीर उल्लंघन

## हल्ला म्हणजे अमेरिकेच्या दुष्ट आणि क्रूर स्वभावाचा

# उत्तर कोरियाचा अमेरिकेला इशारा!

## कोरियाने केला हल्ल्याचा निषेध



। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अमेरिकेने व्हेनेझुएला या देशावर हवाई हल्ला करत व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांच्यासह त्यांच्या पत्नीला अटक केलं. तसेच निकोलस मादुरो यांच्यावर आता अमेरिकेत खटला चालवला जाणार आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलावरील केलेल्या हल्ल्यामुळे जगभरात मोठी खळबळ उडाली असून अनेक देशांनी या हल्ल्याचा निषेध केला. रशिया, चीन, भारत, उत्तर कोरिया यासह अनेक देशांच्या प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. उत्तर कोरियाने या हल्ल्याचा निषेध व्यक्त करत अमेरिकेने केलेला हा हल्ला सार्वभौमत्वाचं गंभीर उल्लंघन असल्याचं म्हणत गंभीर इशारा दिला आहे.**

उत्तर कोरियाने व्हेनेझुएलावरील अमेरिकेच्या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला आणि हे 'सार्वभौमत्वाचं सर्वात गंभीर उल्लंघन'असल्याचं म्हटलं आहे. कोरियन सेंट्रल न्यूज एजन्सी (केसीएनए)च्या हवाल्याने टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, उत्तर कोरियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने म्हटलं की, 'व्हेनेझुएलावरील हल्ला म्हणजे अमेरिकेच्या दुष्ट आणि क्रूर स्वभावाचा आणखी एक पुरावा आहे.'उत्तर कोरियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने इशारा दिला की, अमेरिकेच्या या कृतींमुळे प्रादेशिक अस्थिरता आणखी वाढेल. या हल्ल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला धक्का बसला आहे. मात्र, व्हेनेझुएलावरील परिस्थितीवर आम्ही बारकाईने लक्ष ठेवून आहेत. ही घटना पुन्हा एकदा अमेरिकेच्या क्रूर आणि निर्दयी स्वभावाची पुष्टी करते. आंतरराष्ट्रीय समुदाय हे बऱ्याच काळापासून पाहत आहे, असंही उत्तर कोरियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने म्हटलं.अमेरिका आणि लॅटिन अमेरिकन देश असलेल्या व्हेनेझुएलाचे संबंध गेल्या अनेक वर्षांपासून ताणले गेले आहेत. व्हेनेझुएलामधून अमेरिकेत मोठी ड्रग्ज तस्करी होत असल्याचा आरोप डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. दुसरीकडे व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांनी अमेरिकेचे ड्रग्ज तस्करीचे सर्व दावे फेटाळून लावले आहेत. या दरम्यान त्यांनी व्हेनेझुएलावर अनेक निर्बंध देखील लादले आहेत. गेल्या आठवड्यात डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाची हवाई हद्द बंद करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर अमेरिकेचे हे पाऊल वसाहतवादी असल्याची टीका व्हेनेझुएलाकडून करण्यात आली होती.अमेरिकेने शनिवारी व्हेनेझुएलावर हवाई हल्ला केला. व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अमेरिकेच्या डेल्टा फोर्सच्या जवानांनी ताब्यात घेतले. राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो व त्यांच्या पत्नी सीलिया फ्लोरेस यांना ताब्यात घेऊन अमेरिकन सैनिकांनी व्हेनेझुएलातून अमेरिकेत नेले आहे. या पार्श्वभूमीवर व्हेनेझुएलातील सर्वोच्च न्यायालयाने उप-राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांची अंतरिम सरकारच्या प्रमुखपदी नियुक्ती केली आहे. निकोलस मादुरो यांच्या अनुपस्थितीत आता डेल्सी रॉड्रिग्ज व्हेनेझुएलाची सत्ता सांभाळणार आहेत. डेल्सी रॉड्रिग्ज यांनी मादुरो यांच्या मंत्रिमंडळात काम केले आहे. व्हेनेझुएलातील नागरिकांचे संरक्षण व प्रशासन सांभाळण्यासाठी डेल्सी रॉड्रिग्ज यांची अंतरिम सरकारच्या प्रमुखपदी नियुक्ती केल्याचे व्हेनेझुएलातील सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. ५६ वर्षीय डेल्सी रॉड्रिग्ज या व्हेनेझुएलातील महत्वाच्या नेत्यांपैकी एक मानल्या जातात. निकोलस मादुरो यांच्या निष्ठावान म्हणून त्यांना ओळखले जाते. निकोलस मादुरो यांच्या मंत्रीमंडळात डेल्सी रॉड्रिग्ज या उप-राष्ट्राध्यक्ष, कारभार पाहत होत्या.अमेरिकेने व्हेनेझुएला या देशावर हवाई हल्ला करत व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांच्यासह त्यांच्या पत्नीला अटक केलं.

### अमेरिका-व्हेनेझुएलामध्ये वाद?

अमेरिकेने व्हेनेझुएलावरील केलेल्या हल्ल्यामुळे जगभरात मोठी खळबळ उडाली असून अनेक देशांनी या हल्ल्याचा निषेध केला. रशिया, चीन, भारत, उत्तर कोरिया यासह अनेक देशांच्या प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. उत्तर कोरियाने या हल्ल्याचा निषेध व्यक्त करत अमेरिकेने केलेला हा हल्ला सार्वभौमत्वाचं गंभीर उल्लंघन असल्याचं म्हणत गंभीर इशारा दिला आहे.

# 'निकोलस मादुरोंची तात्काळ सुटका करा'

## चीनची अमेरिकेकडे मागणी; हल्ल्यांवर मांडली 'ही' भूमिका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अमेरिकेने लॅटिन अमेरिकेतील व्हेनेझुएलावर हवाई हल्ला करत व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना ताब्यात घेतलं आहे. तसेच व्हेनेझुएलामध्ये स्थिर सरकार जोपर्यंत स्थापन होणार नाही, तोपर्यंत व्हेनेझुएला हा देश अमेरिका चालवणार असल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली.**

निकोलस मादुरो यांच्यावर आता अमेरिकेत खटला चालवला जाणार आहे, त्यासाठी त्यांना अमेरिकेत नेण्यात आलं आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या हल्ल्याचा जगभरातील देशांनी निषेध व्यक्त केला. रशिया, चीनसह जगातील अनेक देशांनी चिंता व्यक्त केली. अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या कारवाईबाबत आता चीनने आपली भूमिका मांडत एक मोठी मागणी केली आहे. 'निकोलस मादुरोंची तात्काळ सुटका करा', अशी मागणी चीनने केली आहे. तसेच अमेरिकेचं हे पाऊल आंतरराष्ट्रीय कायद्याचं, मूलभूत नियमांचं उल्लंघन असल्याचं चीनने म्हटलं आहे. चीनने अमेरिकेला व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीची तात्काळ सुटका करण्याचं आणि संवाद व



वाटाघाटीद्वारे समस्या सोडवण्याचं आवाहन केलं आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलं की, "अमेरिकेने राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला जबरदस्तीने ताब्यात घेऊन देशाबाहेर नेल्याबद्दल चीन गंभीर चिंता व्यक्त करत आहे. अमेरिकेचं हे पाऊल आंतरराष्ट्रीय कायद्याचं, आंतरराष्ट्रीय संबंधांमधील मूलभूत नियमांचं आणि संयुक्त राष्ट्रांच्या नियमांचं आणि उद्देशाचं स्पष्ट उल्लंघन आहे."

या संदर्भातील वृत्त पीटीआयने दिलं आहे.व्हेनेझुएलातील घडामोडी अत्यंत चिंताजनक आहेत. आम्ही सर्व परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत.

व्हेनेझुएलाच्या लोकांच्या कल्याणासाठी आणि सुरक्षिततेसाठी भारत आपला पाठिंबा पुन्हा एकदा जाहीर करतो. आम्ही सर्व संबंधितांना संवादाद्वारे शांततापूर्ण पद्धतीने समस्या सोडवण्याचं आवाहन करतो. ज्यामुळे या प्रदेशात शांतता आणि स्थिरता सुनिश्चित होईल. संपर्कात असून ते सर्वतोपरी मदत करत राहतील", असं भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटलं आहे. अमेरिका आणि लॅटिन अमेरिकन देश असलेल्या व्हेनेझुएलाचे संबंध गेल्या अनेक वर्षांपासून ताणले गेले आहेत.

### भारताने काय प्रतिक्रिया दिली?

व्हेनेझुएलामधून अमेरिकेत मोठी ड्रग्ज तस्करी होत असल्याचा आरोप डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. दुसरीकडे व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांनी अमेरिकेचे ड्रग्ज तस्करीचे सर्व दावे फेटाळून लावले आहेत. या दरम्यान त्यांनी व्हेनेझुएलावर अनेक निर्बंध देखील लादले आहेत. गेल्या आठवड्यात डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाची हवाई हद्द बंद करण्याचा इशारा दिला.

# लाखात एक आमचा दादा'मध्ये येणार सूर्या दादाची खरी आई!

'झी मराठी' वाहिनीवर प्रसारित होणारी 'लाखात एक आमचा दादा' ही मालिका गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेत तुळजाची भूमिका साकारणाऱ्या मुख्य अभिनेत्रीने प्रकृतीच्या कारणास्तव या मालिकेतून एक्झिट घेण्याचा निर्णय घेतला. आता 'तुळजा'च्या रुपात मालिकेत मृण्मयी गोंधळेकरची एन्ट्री झालेली आहे. यापूर्वी तिने 'सुख म्हणजे नक्की काय असतं' या मालिकेत राजमाची भूमिका साकारली होती. आता नव्या तुळजाला प्रेक्षक कसा प्रतिसाद देणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. सध्या मालिकेत सूर्या आणि तुळजामध्ये वाद निर्माण झाल्याचा सीक्वेन्स चालू आहे. मालिकेत जालिंदरच्या घरातील पार्टीत गोंधळ झाल्यानंतर, सूर्या त्याच्या बहिणींना घरी घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी, त्याच्या चारही बहिणी त्याला त्याची चूक लक्षात आणून देतात. आता सूर्या दादा तुळजाची मनधरणी करण्याचा प्रयत्न करत आहे. अशातच, जगताप कुटुंबीयांच्या घरी धनूला एक स्थळ पाहायला येतं. यावेळी सूर्या



मोठ्या काळजीत पडतो कारण, तुळजाशिवाय पाहुणे लग्नाचा प्रस्ताव नाकारू शकतात...याची त्याला पूर्ण खात्री असते. तुळजाला किमान धनूच्या लग्नाची बोलणी होईपर्यंत तरी थांबण्याची विनंती सूर्या करतो. पाहुणे तुळजाच्या अनुपस्थितीबद्दल विचारपूस करतात. जालिंदर सूर्या आणि तुळजामधील संघर्ष उघड करणार तेवढ्यातच तुळजा दारात येते. यावेळी मालिकेत मृण्मयीची एन्ट्री होणार आहे.तर, आता येत्या काळात तुळजाला वैद्यकीय शिबिरासाठी जेलमध्ये बोलावलं जातं. योगायोगाने, हे तेच जेल आहे जिथे सूर्याची खरी आई आहे आणि जालिंदरला कळतं की ती पॅरोलवर सुटणार आहे. जालिंदरला हे ही समजलंय सूर्या आणि तुळजा याच जेलमध्ये शिबिरासाठी जाणार आहेत. आता जालिंदर सूर्या आणि त्याच्या आईची भेट टाळू शकेल? सूर्या आणि त्याच्या आईची तुरुंगात भेट होईल का? याची उत्तरं प्रेक्षकांना 'लाखात एक आमचा दादा' मालिकेच्या आगामी भागात मिळणार आहेत.

# सुंदरी' मालिकेत खरातची एन्ट्री

या कार्यक्रमामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणारी अभिनेत्री वनिता खरात (VANITA KHARAT) ही आता एका नव्या मालिकेमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. नुकताच 'सुंदरी' (SUNDARI) या मालिकेचा एक प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रोमोमधील वनिताच्या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. सुंदरी या मालिकेच्या प्रोमोमध्ये दिसत आहे की, सुंदरी ही साहेब प्लाझा तोडण्याचा आदेश देते. तेवढ्यात वनिता खरातची एन्ट्री होते. काळी साडी, काळी टिकली आणि ऑक्लाइडचे दागिने अशा लूकमध्ये वनिता दिसत आहे. वनिताचा हा लूक पाहिल्यानंतर लक्षात येत आहे की, सुंदरी या मालिकेत ती खलनायिकेची भूमिका साकारत आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन वनिताला तिच्या या मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. एका नेटकऱ्यानं कमेंट केली,"मला वाटतं वनिता खरातने अशाच नवनवीन भूमिका साकारायला हरकत नाही . या मलिकेत ती खलनायकाची भूमिका खुप सुंदर साकारणार आहे, असं प्रोमो पाहून कळत आहे." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "फायर है तू" तसेच सुयश टिळक,पृथ्वीक प्रताप, प्रियदर्शिनी इंदलकर यांनी देखील सुंदरी या मालिकेच्या प्रोमोला कमेंट करुन वनिताला तिच्या आगामी मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सुंदरी या मालिकेत अभिनेत्री आरती बिराजदार ही प्रमुख भूमिका साकारते. आता सुंदरी या मालिकेत वनिताची एन्ट्री झाल्यानंतर पुढे काय काय घडणार? हे पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.

# हार्ट इमोजी, जोडलेले हात



बॉलिवूडसह हॉलिवूडवर राज्य केलं आहे. अभिनेत्रीचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणा ठरतो. प्रियंकाने नुकतीच 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'मध्ये हजेरी लावली. त्यावेळी तिने तिचं आयुष्य, करिअर, अनुभव यासर्व गोष्टींबद्दल भाष्य केलं. त्यावेळी "मी वाहणारी नदी आहे, एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे", असं प्रियंका म्हणाली. 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'दरम्यान प्रियंका चोप्रा म्हणाली,"मला तलावासारखं व्हायचं नाही. मी वाहणारी नदी आहे. एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे". प्रियंकाचा आज जागतिक पातळीवर दबदबा आहे. मिस वर्ल्ड, नॅशनल अ‍ॅवॉर्ड विजेती बॉलिवूड अभिनेत्री, हॉलिवूड स्टार, गायिका, निर्माती, लेखिका, उद्योगपती सारख्या विविध क्षेत्रांत प्रियंकाने आपल्या कामाचा झेंडा रोवला आहे. प्रियंका चोप्रा म्हणाली,"सिनेसृष्टीत पदार्पण करण्याचा निर्णय माझा नव्हता. या क्षेत्रात मला जबरदस्तीने ढकललं गेलं आहे. त्यानंतर सहकलाकारांकडून अभिनय म्हणजे नक्की काय हे मी शिकले आहे. एखाद्या गोष्टीत मी 100% देत असते. दररोज सर्वोत्कृष्ट काम करण्याचा माझा प्रयत्न असतो. यशाचं फळ मिळतचं. दररोज चांगलं काम केल्यास लवकरच तुम्ही यशस्वी व्हाल.". प्रियंका चोप्रा पुढे म्हणाली,"प्रत्येक प्रोजेक्टमध्ये मी खूप मेहनत घेत असते. संहितेवर काम केल्यानंतरच मी सेटवर जाते. कलाकाराचं काम हे अ‍ॅक्शन आणि कटच्या मध्ये सुरू असतं. पण एखाद्या प्रोजेक्टसाठी 200 लोक मेहनत घेत असतात. तुमचा चेहरा फक्त त्यांचं प्रतिनिधित्व करत असतो. त्यामुळे माझा कोणता सिनेमा चालला नाही तर नक्कीच मला वाईट वाटतं". प्रियंका चोप्राला हॉलिवूडमध्येही बॉलिवूडसारखं काम करायचं आहे. ती म्हणते,"हिंदी मनोरंजनसृष्टीत मी 15 वर्षे काम केलं आहे. तर 6-8 हॉलिवूडपटांमध्ये मी झळकले आहे. पण बॉलिवूडमध्ये जसं विविधतापूर्ण काम करता आलं आहे. तसंच मला हॉलिवूडमध्येही करायचं आहे. स्वत:ला चॅलेंज द्यायला मला आवडेल". 'अंदाज' सिनेमाच्या यशानंतर प्रियंका चोप्राने कधीच मागे वळून पाहिलं नाही. प्लॅन, किस्मत, असंभव सारख्या सिनेमांत तिने काम केलं. 2005 मध्ये आलेला 'मुझसे शादी करोगी' या सिनेमातील प्रियंकाच्या अभिनयाला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली.

# 'परि, स्वरा ते कियारा!

करवा चौथ हा एक महत्त्वाचा सण आहे. प्रामुख्याने उत्तर भारतातील विवाहित महिलांद्वारे साजरा केला जातो. करवा चौथ हा सण विवाहित महिलांसाठी अतिशय महत्वाचा असतो. यंदा करवा चौथ हा सण 1 नोव्हेंबरला म्हणजेच उद्या साजरा होणार आहे. सर्वत्र महिला या सणाच्या तयारीला लागल्या आहेत. त्यातच लग्नानंतरचा करवा चौथ हा खुपच खास असतो. आता बी टाऊनमध्येही अशा कही अभिनेत्री आहेत ज्यांनी या वर्षी 2023 मध्ये लग्न केले आहे. या अभिनेत्री आपल्या लग्नानंतरच्या पहिल्या करवा चौथसाठी खूप उत्सुक आहेत. चला तर मग जाणून घेऊया या वर्षी कोणती बॉलिवूड अभिनेत्री आपली पहिली करवा चौथ साजरी करणार आहे. यात पहिल नाव येत ते अभिनेत्री कियारा अडवाणीचे. कियाराने सिद्धार्थ मल्होत्रासोबत फेब्रुवारी 2023 मध्ये लग्न केले आहे. कियारा तिचा पहिला करवा चौथ साजरा करण्यासाठी तयार आहे. 'शेरशाह' चित्रपटाच्या सेटवर दोघांची लव्हस्टोरी सुरु झाली.



# 50 वर्ष साथ देणाऱ्या साथीदाराचे बिग बींनी केले कौतुक

ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चर्चेत आला आहे. ज्यामध्ये ते त्यांचे मेकअपमॅन दीपक सावंत यांचे कौतुक करताना दिसले. महानायक अमिताभ बच्चन यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. त्यांची गेली 50 वर्ष साथ देणाऱ्या दीपक सावंत या मराठमोळ्या मेकअप आर्टिस्टचे कौतुक करणारा हा व्हिडिओ आहे. बिग बी गेल्या 55 वर्षांहून सिनेविश्वात सक्रीय आहेत, त्यातील 50 वर्ष दीपक त्यांच्यासोबत काम करत आहेत. अलिकडेच 'कौन बनेगा करोडपती'च्या मंचावर अमिताभ यांनी दीपक यांचे कौतुक केले. त्याच्या वक्तशीरपणाबद्दल बोलताना एका भावुक प्रसंगाचाही त्यांनी उल्लेख केला. दीपक सावंत यांच्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवरुन या प्रसंगाचा व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. त्यांनी हा व्हिडिओ शेअर करताना अमिताभ बच्चन यांच्याबद्दल म्हटले की, 'अमिताभ बच्चन यांचे प्रेमळ शब्द आणि कौतुक नेहमीच प्रेरणा देणारे ठरले. विनम्र, आदर करणाऱ्या आणि आपल्या टीमवर मनापासून प्रेम करणाऱ्या व्यक्तीबरोबर काम करणं हा एकप्रकारे आशीर्वादच आहे. वयाच्या 76 व्या वर्षीही त्यांनी दिलेले प्रोत्साहन मला त्यांच्यासाठी अधिक मेहनत करण्याची प्रेरणा देत राहते.'

## आयपीएलचं प्रसारण बंद — मुस्ताफिझूर प्रकरणावरून बांगलादेश आक्रमक

# अपमान सहन केला जाणार नाही!

### मुस्ताफिझूर रहमान रिलीज

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुरावलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने आयपीएल स्पर्धेतील कोलकाता नाईट रायडर्स संघातील बांगलादेशचा डावखुरा वेगवान गोलंदाज मुस्ताफिझूर रहमानला रिलीज करण्याचे निर्देश दिले आहेत. बीसीसीआयच्या निर्देशानुसार कोलकाता नाईट रायडर्स संघाने तातडीने प्रसिद्धीपत्रक जारी करत मुस्ताफिझूरला रिलीज करत असल्याचं स्पष्ट केलं.**



मुस्ताफिझूरच्या ऐवजी बदली खेळाडू देण्याची तरतूद बीसीसीआयने केली आहे. मात्र अनसोल्ड खेळाडूंमधून मुस्ताफिझूरसारखा खेळाडू शोधणं कोलकातासाठी मोठं आव्हान असणार आहे. दरम्यान मुस्ताफिझूरला रिलीज करण्याच्या मुद्यावरून बांगलादेश आक्रमक झालं आहे. बांगलादेश सरकारचे सल्लागार असिफ नझरुल यांनी पुढील महिन्यात होणाऱ्या टी२० वर्ल्डकप स्पर्धेतील बांगलादेशचे भारतात होणारे सामने श्रीलंकेत खेळवण्यात यावेत अशी सूचना केली आहे. बांगलादेशमध्ये आयपीएलचं प्रसारण होणार नाही यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाला सूचित केल्याचं असिफ यांनी स्पष्ट केलं.'बांगलादेश क्रिकेटचा, क्रिकेटपटूंचा अपमान सहन केला जाणार नाही. बांगलादेशात आयपीएलचं प्रसारण होऊ नये यासाठी सूचना दिल्या आहेत.गुलामीचे दिवस सरले.आता असं चालणार नाही', असं असिफ यांनी सांगितलं.बांगलादेशमध्ये हिंदू नागरिकांवर होणारे हल्ले आणि अत्याचार या पार्श्वभूमीवर भारतात बांगलादेशविरुद्ध आंदोलनं सुरू आहेत. आयपीएल स्पर्धेत बांगलादेशच्या खेळाडूंना खेळू देऊ नये असाही सूर होता. लोकांच्या भावना लक्षात घेऊन बीसीसीआयने यंदाच्या हंगामातील एकमेव बांगलादेशचा खेळाडू मुस्ताफिझूर रहमानला रिलीज करण्याचे आदेश दिले होते. कोलकाता नाईट रायडर्स संघाने निर्देशाचं पालन करत मुस्ताफिझूरला रिलीज केलं. भारताचे परराष्ट्र मंत्री जयशंकर हे बांगलादेशचे माजी पंतप्रधान खालेदा झिया यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित होते. यानंतर आयपीएलमध्ये बांगलादेशच्या खेळाडूला रिलीज करण्यापर्यंत गोष्टी एवढ्या टोकाला जातील याची बांगलादेश क्रिकेट बोर्डाला कल्पना नव्हती. शुक्रवारी बांगलादेश क्रिकेट बोर्डाने सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या भारतीय संघाच्या बांगलादेश दौऱ्याचं वेळापत्रक जाहीर केलं. मात्र मुस्ताफिझूर रहमानला रिलीज केल्यानंतर बीसीसीआयने हा दौरा स्थगित केल्याचं वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं होतं.या दौऱ्यासंदर्भात आणि मुस्ताफिझूरला आयपीएलमधून रिलीज करण्यासंदर्भात आम्हाला बीसीसीआयकडून औपचारिकदृष्ट्या कळवण्यात आलेलं नाही. ते कळवल्यानंतर पुढे काय करायचं याचा निर्णय घेऊ असं बांगलादेश क्रिकेट बोर्डातील सूत्रांनी सांगितलं. मुस्ताफिझूर रहमान हा धावा रोखण्यात आणि विकेट्स पटकावण्यात माहीर आहे. २०१६ पासून तो आयपीएलच्या आठ हंगामात खेळला आहे. सनरायझर्स हैदराबाद, मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स, चेन्नई सुपर किंग्स, राजस्थान रॉयल्स या संघांकडून खेळला आहे. यंदाच्या वर्षी केकेआरसाठी खेळण्याची त्याची पहिलीच वेळ असणार होती. मात्र आता त्याला खेळता येणार नाही.भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुरावलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने आयपीएल स्पर्धेतील कोलकाता नाईट रायडर्स संघातील बांगलादेशचा डावखुरा वेगवान गोलंदाज मुस्ताफिझूर रहमानला रिलीज करण्याचे निर्देश दिले आहेत. बीसीसीआयच्या निर्देशानुसार कोलकाता नाईट रायडर्स संघाने तातडीने प्रसिद्धीपत्रक जारी करत मुस्ताफिझूरला रिलीज करत असल्याचं स्पष्ट केलं. मुस्ताफिझूरच्या ऐवजी बदली खेळाडू देण्याची तरतूद बीसीसीआयने केली आहे. मात्र अनसोल्डखेळाडू शोधणं कोलकातासाठी मोठं आव्हान असणार आहे.मुस्ताफिझूरला रिलीज करण्याच्या मुद्यावरून बांगलादेश आक्रमक झालं आहे

### बांगलादेश आक्रमक झाला

. बांगलादेश सरकारचे सल्लागार असिफ नझरुल यांनी पुढील महिन्यात होणाऱ्या टी२० वर्ल्डकप स्पर्धेतील बांगलादेशचे भारतात होणारे सामने श्रीलंकेत खेळवण्यात यावेत अशी सूचना केली आहे. बांगलादेशमध्ये आयपीएलचं प्रसारण होणार नाही यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाला सूचित केल्याचं असिफ यांनी स्पष्ट केलं.'बांगलादेश क्रिकेटचा, क्रिकेटपटूंचा अपमान सहन केला जाणार नाही. बांगलादेशात आयपीएलचं प्रसारण होऊ नये यासाठी सूचना दिल्या आहेत.

# श्रेयस अय्यर भारतीय संघात पुनरागमन

## न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नवीन वर्षातल्या पहिल्या मोहिमेसाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली आहे. न्यूझीलंडविरुद्ध तीन वनडे सामन्यांची मालिका होत आहे. या मालिकेसाठी श्रेयस अय्यरचं संघात पुनरागमन झालं आहे मात्र त्याचा मालिकेतील सहभाग वैद्यकीय चमूच्या परवानगीवर अवलंबून असेल.**




मानेला झालेल्या दुखापतीमुळे गिल आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळू शकला नव्हता. मात्र आता तो या दुखापतीतून सावरला आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यात झालेल्या दुखापतीमुळे श्रेयस अय्यर प्रदीर्घ काळ मैदानापासून दूर होता. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेसाठी त्याची संघात निवड करण्यात आली आहे. मात्र त्याचं खेळणं बंगळुरूस्थित नॅशनल क्रिकेट अकादमीतील वैद्यकीय चमूच्या परवानगीवर अवलंबून असेल.गिल, श्रेयस आणि सिराज हे तिलक वर्मा, ध्रुव जुरेल आणि ऋतुराज गायकवाड यांच्या जागी परतले आहेत.भारतीय संघ नव्या वर्षाची सुरूवात न्यूझीलंडविरूद्ध होणाऱ्या वनडे मालिकेने करणार आहे. ११ जानेवारीपासून दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांच्या मालिकेला सुरूवात होणार आहे. या मालिकेतून भारताचे स्टार फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा ही जोडी पुनरागमन करताना दिसणार आहे. तर ही मालिका झाल्यानंतर दोन्ही संघ ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळण्यासाठी आमनेसामने येणार आहेत. ही मालिका भारतीय संघासाठी अतिशय महत्वाची असणार आहे. ही भारतीय संघासाठी शेवटची टी-२० मालिका असणार आहे. येत्या ७ फेब्रुवारीपासून आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला सुरूवात होणार आहे.

### भारतीय संघाची घोषणा

न्यूझीलंडविरूद्ध होणाऱ्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. पण वनडे मालिकेसाठी अद्यापही भारतीय संघाची घोषणा करण्यात आलेली नाही. माध्यमातील वृत्तानुसार, ३ किंवा ४ जानेवारीला वनडे मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली जाऊ शकते. भारतीय संघातील खेळाडू सध्या विजय हजारे ट्रॉफी स्पर्धा खेळण्यात व्यस्त आहेत.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
। सोमवार ।
दि. 5 जानेवारी 2026


## स्वामी विवेकानंद बालकाव्य मंचाच्या विद्यार्थ्यांच्या स्वरचित कवितांचा

# ‘काव्य सरिता’ काव्यसंग्रह प्रकाशित!

### 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बालकवींच्या सर्जनशीलतेला राष्ट्रीय व्यासपीठ

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स्वामी विवेकानंद बालकाव्य मंच, मोशी येथील विद्यार्थ्यांच्या स्वरचित कवितांचा ‘काव्य सरिता’ हा काव्यसंग्रह नुकताच ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अत्यंत दिमाखात प्रकाशित करण्यात आला. सातारा येथे भरलेल्या या प्रतिष्ठित साहित्य संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस तसेच अन्य मान्यवरांच्या शुभहस्ते या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.**



या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनामुळे लहान वयातच साहित्यनिर्मितीची गोडी लागलेल्या बालकवींना राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ मिळाले असून, त्यांच्या सर्जनशीलतेचा आणि कल्पकतेचा सन्मान झाला आहे.

**बालमनातील भावविश्वाचा आरसा**

‘काव्य सरिता’ या बालकाव्यसंग्रहात स्वामी विवेकानंद बालकाव्य मंचातील विद्यार्थ्यांनी रचलेल्या विविध विषयांवरील कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. निसर्गाचे सौंदर्य, पशुपक्षी, देशप्रेम, आई-वडील, कुटुंब, मैत्री आणि विविध नातेसंबंधांवरील भावस्पर्शी काव्यरचना या संग्रहाचे वैशिष्ट्य ठरल्या आहेत. बालमनातील निरागस विचार, स्वच्छ भावभावना आणि कल्पनाशक्ती यांचे सुंदर दर्शन या कवितांमधून घडते.

विद्यार्थ्यांच्या साहित्यिक अभिव्यक्तीला योग्य दिशा मिळावी, त्यांच्यात लेखनाची आवड निर्माण व्हावी आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने स्वामी विवेकानंद बालकाव्य मंचाच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

**शैक्षणिक उपक्रमाला साहित्यिक अधिष्ठान**

या कार्यक्रमावेळी विभागप्रमुख दिव्या भोसले आणि स्वाती पाटील या शिक्षिका स्वामी विवेकानंद बालकाव्य मंचाच्या वतीने उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांच्या लेखनप्रक्रियेतील अनुभव सांगत बालकाव्य मंचाच्या कार्याचा आढावा उपस्थित मान्यवरांसमोर मांडला. संस्थेचे संस्थापक विनायकराव भोंगाळे, सचिव संजय भोंगाळे, संचालिका कविता कड्डू पाटील, सीईओ श्रीमती अंजली भागवत तसेच मुख्याध्यापक श्रीकांत राहणे यांनी या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मनापासून अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**राष्ट्रीय स्तरावर कार्याचा गौरव**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासारख्या मानाच्या व्यासपीठावर बालकाव्यसंग्रहाचे प्रकाशन होणे ही स्वामी विवेकानंद बालकाव्य मंचासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या साहित्यिक अभिव्यक्तीला मिळालेल्या या संधीमुळे शैक्षणिक उपक्रमांना साहित्यिक अधिष्ठान मिळाले असून, भावी पिढीत साहित्यप्रेम रुजविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे

**बालसाहित्याला नवी दिशा**

‘काव्य सरिता’ काव्यसंग्रहामुळे बालसाहित्य क्षेत्रात नव्या कवींची ओळख निर्माण होत असून, विद्यार्थ्यांच्या सर्जनशील क्षमतेला व्यापक व्यासपीठ मिळाले आहे. स्वामी विवेकानंद बालकाव्य मंचाचा हा उपक्रम भविष्यातही अनेक बालकवींना प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास साहित्यप्रेमींनी व्यक्त केला आहे.

---

## इंद्रायणी नगर प्रभाग क्र.८ मध्ये भाजप उमेदवारांची प्रचारात आघाडी

### मिशन-PCMC: नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, विकासाचे व्हीजन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड: इंद्रायणी नगर प्रभाग क्रमांक ८ मध्ये भारतीय जनता पार्टी व आरपीआय (आठवले गट) पक्षाच्या अधिकृत उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतली असून त्यांच्या प्रचार दौऱ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.**

प्रभाग क्रमांक ८ मधील भाजप-आरपीआय (आठवले) पक्षाचे अधिकृत सुशिक्षित उमेदवार (अ) डॉ. सुहास लक्ष्मण कांबळे, (ब) सौ. नम्रता योगेश लोंढे, (क) सौ. निलम शिवराज लांडगे आणि (ड) श्री. मडिगेरी विलास हनुमंतराव यांनी विविध




भागांत प्रचार दौरा केला. सेक्टर क्रमांक १ येथील महाराष्ट्र कॉलनी परिसर, वैष्णो माता कॉलनी, रामतीलक सोसायटी सर्कल तसेच बँक ऑफ महाराष्ट्र सर्कल या भागांमध्ये हा प्रचार दौरा उत्साहात पार पडला.

यावेळी नागरिकांनी उमेदवारांचे स्वागत करत त्यांना भरभरून प्रतिसाद दिला. नागरिकांचे प्रेम, पाठिंबा आणि आशीर्वाद हेच आमचे खरे बळ असल्याची भावना चारही उमेदवारांनी व्यक्त केली. तसेच इंद्रायणी नगर व इंदिरानगर परिसराचा सर्वांगीण विकास हा भाजपचा प्रमुख ध्यास असल्याचा विश्वास उमेदवारांनी मतदारांसमोर मांडला. या विकासाच्या भूमिकेला मतदारांनी सकारात्मक प्रतिसाद देत चारही उमेदवार भाजपाचेच विजयी होतील, अशी ग्वाही दिल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर

# विकासाच्या मुद्द्यावर शिवसेनेची जोरदार मुसंडी!

## प्रभाग क्रमांक 20 :राजेश वाबळे यांच्या नेतृत्वाखालील पॅनलला नागरिकांचा पाठिंबा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड :पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २० मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. संत तुकाराम नगर, वल्लभनगर, महात्मा फुलेनगर, लांडेवाडी, कासारवाडी आणि नाणेकर चौक या परिसरांचा समावेश असलेल्या या प्रभागात शिवसेनेच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचाराला मोठी गती मिळाली असून जनसामान्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.**

शिवसेना महानगरप्रमुख राजेश चिमणराव वाबळे यांच्या नेतृत्वाखालील पॅनल प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून मतदारांपर्यंत पोहोचत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि मूलभूत नागरी सुविधा या प्रश्नांवर ठोस भूमिका मांडत उमेदवार नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत परिवर्तनाची लाट दिसून येत असल्याचे स्थानिक मतदारांकडून सांगण्यात येत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जनहितकारी योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी तसेच खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागाचा विकास करण्याचा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला आहे. प्रभाग क्रमांक २० हा आदर्श प्रभाग म्हणून विकसित करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे त्यांनी प्रचारादरम्यान स्पष्ट केले.प्रभागातील शाश्वत विकास आणि समस्यामुक्त परिसरासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदानात सहभागी व्हावे, असे आवाहन राजेश

### शिवसेनेकडे महिला मतदारांचा कल

राज्य शासनाच्या महिलाभिमुख योजनांमुळे महिला मतदारांचा कल मोठ्या प्रमाणात शिवसेनेकडे झुकलेला दिसत आहे. प्रचारादरम्यान महिलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळत असून उमेदवारांच्या प्रचाराला विशेष बळ मिळाले आहे. राजेश वाबळे यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या विकासकामांचा अनुभव आणि सातत्यपूर्ण संपर्क ही या

### हे उमेदवार मैदानात!

या प्रभागातून शिवसेनेतर्फे विनोद नामदेव वाघमारे, वैशाली राजेश वाबळे, स्वीटी निलेश मलातपुरे आणि राजेश चिमणराव वाबळे हे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. सर्व उमेदवारांचा सामाजिक कार्याचा अनुभव आणि जनसंपर्क दांडगा असल्याने मतदारांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# प्रभाग ५ मध्ये 'अजित भाऊ गव्हाणे' यांच्या शिलेदारांची बाजी!

## घराघरांत पोहोचतोय विकासाचा अजेंडा!;मिशन-PCMC: महिलांच्या हाताला काम, रोजगाराचे ठोस आश्वासन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**पिंपरी-चिंचवड | पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ५ मधील राजकीय वातावरण तापले असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित गव्हाणे समर्थक) अधिकृत उमेदवार प्रियंका बारसे, अमर फुगे, श्रीमती भीमाताई फुगे (काकी) आणि ॲड. राहुल गवळी यांनी प्रचारात ठोस आघाडी घेतली आहे. 'अजित भाऊ गव्हाणे' यांच्या नेतृत्वाखालील या शिलेदारांनी तळागाळातील मतदारांपर्यंत थेट पोहोचण्याचा निर्धार केल्याने प्रभागात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.**

संत तुकाराम नगर, नंदनवन कॉलनी, मोरया कॉलनी तसेच पाण्याची टाकी परिसरात उमेदवारांनी पदयात्रा, कोपरा सभा आणि नागरिक संवादाचा धडाका लावला आहे. केवळ घोषणाबाजी न करता, आतापर्यंत केलेली विकासकामे आणि भविष्यातील नियोजनाची माहिती असलेली पत्रके (पॅम्प्लेट्स) घेऊन उमेदवार मतदारांच्या भेटीला जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून प्रभागाचा सर्वांगीण कायापालट करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

प्रचारादरम्यान महिला वर्गाचा सहभाग लक्षणीय दिसून येत आहे. "आजच्या महागाईच्या काळात एका व्यक्तीच्या पगारावर कुटुंब चालवणे अवघड झाले आहे. त्यामुळे प्रत्येक महिलेच्या हाताला काम मिळणे ही काळाची गरज आहे," असे मत प्रियंका बारसे आणि भीमाताई फुगे यांनी व्यक्त केले. महिलांसाठी लघुउद्योग, गृहउद्योग आणि कौशल्य विकास केंद्रे सुरू करून स्वावलंबनाची संधी देण्याचे ठोस आश्वासन देण्यात आले.

### ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांचा विश्वास

नंदनवन कॉलनी व परिसरातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधताना ॲड. राहुल गवळी आणि अमर फुगे यांनी स्थानिक प्रश्नांवर ठाम भूमिका मांडली. "विकासाभिमुख दृष्टिकोन आणि समाजकार्याची तळमळ या जोरावर आम्ही जनतेसमोर जात आहोत," असे त्यांनी सांगितले. थेट संवादामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

> प्रभागातील मूलभूत सुविधांपासून रोजगारनिर्मितीपर्यंतचा आमचा विकासाचा अजेंडा स्पष्ट आहे. आम्ही दिलेली आश्वासने ही केवळ शब्दांची फुलोरा नसून, ती प्रत्यक्षात उतरवण्याची ताकद आणि इच्छाशक्ती राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे.
> **–अमर फुगे,** उमेदवार, राष्ट्रवादी, प्रभाग- 5.

> जनतेचा विश्वास हीच आमची खरी संपत्ती आहे. थेट संवाद, पारदर्शक कामकाज आणि स्थानिक प्रश्नांवर ठोस उपाययोजना या माध्यमातून हा विश्वास अधिक मजबूत करण्याची जबाबदारी आम्ही प्रामाणिकपणे पार पाडू.
> **–ॲड. राहुल गवळी,** उमेदवार, राष्ट्रवादी, प्रभाग- 5.

## तरुण असूनही स्पष्ट दृष्टी असलेले

# PCU वेगाने प्रगतीपथावर: डॉ. विजय भाटकर!

## शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड विद्यापीठाचा पहिला ऐतिहासिक दीक्षांत समारंभ

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पुणे : पिंपरी चिंचवड विद्यापीठ (PCU) तरुण असूनही स्पष्ट दृष्टी, ठोस ध्येयधोरणे आणि जागतिक उद्दिष्टे घेऊन उच्च शिक्षण क्षेत्रात वेगाने पुढे जात असल्याचे प्रतिपादन प्रख्यात शास्त्रज्ञ, पद्मश्री, पद्मभूषण व महाराष्ट्र भूषण पुरस्कारप्राप्त आणि भारताच्या पहिल्या स्वदेशी महासंगणक 'परम'चे शिल्पकार डॉ. विजय भाटकर यांनी केले. पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.**

विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवासातील हा पहिला आणि ऐतिहासिक दीक्षांत समारंभ उत्साहात पार पडला. या प्रसंगी पदवीधर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात आला. उद्योग-संलग्नता, संशोधन, नवोन्मेष आणि मूल्याधारित शिक्षणावर आधारित उच्च शिक्षणाची स्पष्ट दिशा विद्यापीठाने यावेळी अधोरेखित केली.

समारंभाला संबोधित करताना PCU चे माननीय कुलपती यांनी विद्यापीठाचे INDUSTRY-ENGAGED UNIVERSITY म्हणून विकसित होण्याचे उद्दिष्ट मांडले. उद्योगासाठी तत्पर विद्यार्थी घडविण्याबरोबरच संशोधन, ज्ञाननिर्मिती आणि कुशल मनुष्यबळाच्या माध्यमातून उद्योग क्षेत्राला पाठबळ देण्याची भूमिका PCU बजावत असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणसंस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे आर्थिक व सामाजिक आव्हानांवर प्रभावी उपाय शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुणे डॉ. विजय भाटकर यांनी PCU च्या दीर्घकालीन शैक्षणिक दृष्टीचे विशेष कौतुक केले. विद्यापीठाच्या जागतिक शैक्षणिक विस्ताराच्या योजना तसेच प्रस्तावित केंद्रीय संशोधन सुविधा आणि संशोधन केंद्रांचा उल्लेख करत, ही केंद्रे विद्यार्थी, प्राध्यापक आणि उद्योग क्षेत्रासाठी आंतरशाखीय संशोधन व व्यावहारिक समस्यांच्या निराकरणासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सन्माननीय पाहुणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) प्रभावीपणे अंमलात आणल्याबद्दल पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे अभिनंदन केले. PCU ची शैक्षणिक रचना NEP च्या आत्म्याशी सुसंगत असून बहुविषयक अभ्यास, लवचिकता आणि सर्वांगीण शिक्षणाला प्रोत्साहन देणारी असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योग क्षेत्राचा दृष्टिकोन मांडताना विज्ञान व तंत्रज्ञान उद्यान, पुणेचे महासंचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी PCU च्या उद्योग-सज्जतेवरील भराचे कौतुक केले. विद्यापीठाने नोकरी शोधणाऱ्यांबरोबरच नोकरी निर्माण करणारे उद्योजक घडवावेत, असे आवाहन त्यांनी केले.

यापूर्वी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी PCU च्या अल्पकालावधीत झालेल्या उल्लेखनीय प्रगतीचा आढावा घेतला. केवळ पदवीधर नव्हे तर नैतिक मूल्यांवर आधारित, सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि उद्योग-सज्ज व्यक्तिमत्त्व घडविणे हे विद्यापीठाचे ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या दीक्षांत समारंभास पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (PCET) चे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा श्रीमती पद्मा भोसले, सचिव श्री. विठ्ठल काळभोर, खजिनदार श्री. शांताराम गराडे, कुलपती श्री. हर्षवर्धन एस. पाटील, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्यासह विश्वस्त मंडळ, गव्हर्निंग बॉडी व व्यवस्थापनातील मान्यवर उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड विद्यापीठाचा पहिला दीक्षांत समारंभ हा केवळ विद्यार्थ्यांच्या यशाचा उत्सव न राहता, विद्यापीठाच्या दूरगामी दृष्टीची ठाम घोषणा ठरला. शिक्षण, संशोधन, उद्योग-संलग्नता आणि नैतिक मूल्यांचा समन्वय साधत PCU उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात एक महत्त्वाकांक्षी आणि उदयोन्मुख विद्यापीठ म्हणून स्वतःची ओळख अधिक दृढ करत आहे.

## प्रभाग क्र. १० मध्ये भाजप उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद

## मिशन- PCMC: विकासकामांवर नागरिकांचा विश्वास

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १० मध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना नागरिकांकडून उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. विकासकामांचा ठोस अनुभव आणि विश्वासार्ह नेतृत्वामुळे नागरिकांचा कल भाजप उमेदवारांकडे वाढताना दिसत आहे.**

भारतीय जनता पार्टीने प्रभाग क्रमांक १० मधून एक जागा बिनविरोध जिंकली असून उर्वरित तीन जागांसाठी सर्वसामान्य कुटुंबातून आलेले, कामाशी जोडलेले आणि जनतेच्या प्रश्नांशी थेट संबंधित उमेदवार दिल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. हा निर्णय म्हणजे जनतेच्या अपेक्षांना दिलेले योग्य उत्तर असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. प्रचाराला जोरदार सुरुवात झाली असून घरभेटी, पदयात्रा आणि थेट संवादाच्या माध्यमातून उमेदवार नागरिकांपर्यंत पोहोचत आहेत. प्रचारादरम्यान प्रभागात यापूर्वी झालेल्या विविध विकासकामांचे नागरिकांकडून विशेष कौतुक होत आहे. त्याचबरोबर रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, वीज, कचरा व्यवस्थापन आदी दैनंदिन प्रश्न व प्रलंबित तक्रारी नागरिक थेट उमेदवारांसमोर मांडत आहेत. दरम्यान, आमदार अमित गोरखे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून प्रभाग क्रमांक १० साठी विकासनिधीतून लहान मुलांसाठी सुरक्षित 'मॅट प्ले-ग्राउंड' उभारणीस मंजुरी मिळाल्याने नागरिकांमध्ये विशेष समाधान व्यक्त केले जात आहे. बालकांच्या सुरक्षित खेळासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा निर्णय विकासाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल असल्याचे नागरिकांचे मत आहे.

> "प्रभाग क्रमांक १० मधील प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत गरजा, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकास हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. नागरिकांनी दाखवलेला विश्वास आम्ही प्रामाणिकपणे विकासकामांतून उतरवू. शब्दांपेक्षा कामातूनच उत्तर देत, हा प्रभाग अधिक सक्षम, स्वच्छ आणि सुरक्षित करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू.
>
> – **अनुराधा गोरखे,**
> **उमेदवार, भाजपा, प्रभाग- 10.**

### डिजिटल जाहिरात मोहिम

"फक्त आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष काम" ही भारतीय जनता पार्टीची ओळख असून, आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक १० मध्ये विकासाची गती अधिक वेगाने वाढेल, असा विश्वास नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

## पिंपळे सौदागरमध्ये शहराध्यक्ष

# शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वात भाजपचा 'धडाका'

## मिशन- PCMC : "आपकी बार 100 पार"चा नारा देत जोरदार प्रचार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत "आपकी बार १०० पार"चा नारा देत भारतीय जनता पक्षाने जोरदार प्रचाराला सुरुवात केली असून, पिंपळे सौदागर–रहाटणी प्रभागात भाजपचा प्रभाव अधिकच वाढताना दिसत आहे. भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे यांचा बालेकिल्ला असलेल्या प्रभाग क्रमांक २८ मध्ये यंदा चारही जागांवर कमळ फुलणार, असा ठाम विश्वास मतदार व्यक्त करत आहेत.**

प्रभाग क्रमांक २८ मध्ये भाजपा–आरपीआय (आठवले गट) चे अधिकृत उमेदवार शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे, संदेश काटे, अनिता संदीप काटे आणि कुंदाताई संजय भिसे हे चारही उमेदवार निवडणूक रिंगणात असून, संपूर्ण प्रभागात भाजपमय वातावरण निर्माण झाले आहे. प्रचाराच्या माध्यमातून विकासकामांचा लेखाजोखा मांडत उमेदवार मतदारांशी थेट संवाद साधत आहेत. भाजपच्या चारही उमेदवारांनी यंदा चारही जागा जिंकण्याचा संकल्प केला असून, प्रभाग क्रमांक २८ मधील रहाटणी व पिंपळे सौदागर परिसर अक्षरशः पिंजून काढण्यात येत आहे. सकाळपासूनच विविध सोसायट्यांमध्ये गाठीभेटी, संवाद व प्रचार फेऱ्यांवर भर देण्यात येत आहे. शनिवार–रविवार सुट्टीचे दिवस असल्याने मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद उमेदवारांना मिळत आहे.

यावेळी अनेक सोसायटीधारकांनी केंद्र व राज्यातील भाजप सरकारमुळे पिंपळे सौदागर परिसराचा सर्वांगीण विकास झाल्याचे सांगितले. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सुरक्षा आणि मूलभूत सुविधांमध्ये झालेल्या सुधारणा लक्षात घेता विकासात्मक आणि भयमुक्त पिंपळे सौदागर–रहाटणीसाठी आम्ही भाजपसोबत आहोत, असा ठाम विश्वास मतदारांनी उमेदवारांना दिला आहे.

> "पिंपळे सौदागर–रहाटणीच्या प्रत्येक रहिवाशासाठी विकास, सुरक्षा आणि सुव्यवस्था हाच आमचा ध्यास आहे. आपण दिलेल्या विश्वासावर आम्ही खरे उतरू आणि प्रभाग क्रमांक २८ चे चारही उमेदवार बहुमताने निवडून आणू.
>
> **–शत्रुघ्न काटे,** उमेदवार, भाजपा, प्रभाग- 28.

## आरोग्य, स्वच्छता आणि संकटावर मात करणारा नेता : तुषार कामठे

## मिशन- PCMC : "प्रत्येक नागरिकाच्या आरोग्याची काळजी, प्रत्येक रस्त्याची स्वच्छता

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज






**अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याच्या गरजेनंतर, आजच्या काळात आरोग्य ही सर्वात महत्त्वाची मूलभूत गरज बनली आहे. कोरोना महामारीने शहरात सर्वत्र हाहाकार माजवला होता; लोक भयभीत झाले आणि कोरोना प्रतिबंधित लस मिळविण्यासाठी नागरिक जीवाचे रान करत होते. नोंदणीसाठी आरोग्य केंद्रावर भल्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. या धडपडीला थांबविण्यासाठी आणि नागरिकांना वेळेवर लस मिळविण्यासाठी, तुषार कामठे यांनी आपल्या प्रभागात तातडीचे लसीकरण केंद्र सुरू केले. या केंद्रांमुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास घेतला आणि कोरोना प्रतिबंधन अधिक सुलभ झाले.**

संकटे याच थांबले नाहीत. वायसीएम रुग्णालयात गॅस गळतीमुळे चार जण मृत्युमुखी पडले. घटनेची माहिती मिळताच, तुषार कामठे रुग्णालयात धाव घेतली आणि परिस्थितीचा ताबडतोब आढावा घेतला. या काळात त्यांना स्वतःला कोरोना झाला; तरीही, त्यांचे काम थांबले नाही.

> "माझ्यासाठी प्रत्येक नागरिकाचे आरोग्य ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. मी फक्त वचन देत नाही, तर प्रत्यक्ष काम करून दाखवतो. कोरोना महामारीच्या धक्क्यांना तोंड देताना लसीकरण केंद्र सुरू केले आणि नागरिकांना वेळेवर मदत केली. संकट, आपत्ती, कोणताही अडथळा – काहीही असो, मी हार मानत नाही. प्रभाग आरोग्यदायी, स्वच्छ आणि सुरक्षित असेल तरच त्याची खरी समृद्धी साधता येते, आणि त्यासाठी मी प्रत्येक क्षण झटतो."
>
> **–तुषार कामठे, उमेदवार,** राष्ट्रवादी शरद पवार पक्ष, प्रभाग- 26.

कमी वेळेत आरोग्य सुविधा उभारणे आणि लसीकरण मोहीम यशस्वी करणे हे आव्हानात्मक होते, पण तुषार कामठे यांनी हार न मानता आणि आरोग्य विभागाच्या सहकार्याने, नागरिकांसाठी हे संकट यशस्वीरीत्या पेलले.

याव्यतिरिक्त, तुषार कामठे यांनी सरकारी रुग्णालयांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि नागरिकांना घराजवळच वेळेवर उपचार मिळू शकले. अत्यल्प दरात औषधे व उपचार उपलब्ध असल्यामुळे, सर्वसामान्य नागरिकांवरील आर्थिक ताणही कमी झाला आहे.

आरोग्याबरोबरच स्वच्छता आणि सार्वजनिक व्यवस्थापन याकडेही त्यांनी विशेष लक्ष दिले आहे. प्रभागात नियमित घंटागाडी सुरु करून त्यांनी निवडणुकीपूर्वी केलेल्या स्वच्छतेच्या संकल्पाची यशस्वी अंमलबजावणी केली.

कचरा संकलन, सांडपाणी व्यवस्थापन आणि नियोजन यामुळे प्रभाग स्वच्छ, सुंदर आणि रोगमुक्त राहिला आहे. या सर्व मानवतेच्या कार्याचा फायदा आता तुषार कामठे यांना निवडणुकीत होणार आहे. प्रभाग क्रमांक 26 पिंपळे निखल- विशालनगर मधील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार तुषार कामठे, संकेत जगताप, सारिका कस्पटे, सीमा साठे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे.

### छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना अर्पण करून

# मोशीत प्रचार दौऱ्याची सुरुवात!

## मिशन- PCMC : प्रभाग दोनमध्ये वसंत बोराटे पॅनलला नागरिकांचा वाढता पाठिंबा






। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी नगरसेवक वसंत बोराटे यांच्या प्रचार दौऱ्याची मोशी येथे भावनिक आणि पारंपरिक वातावरणात सुरुवात झाली. छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस मानवंदना अर्पण करून प्रचाराचा श्रीगणेशा करण्यात आला. त्यानंतर परंपरेनुसार ग्रामदैवत नागेश्वर महाराज मंदिरात नारळ फोडून प्रचार दौऱ्याचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला.**



मोशीतील विविध भागांतून नागरिकांच्या भेटी, संवाद आणि आशीर्वाद घेत हा दौरा पुढे सरकला. केवळ निवडणूक प्रचार न करता नागरिकांच्या समस्या ऐकून घेणे, त्यांच्या अपेक्षा समजून घेणे आणि पुढील वाटचालीबाबत संवाद साधणे हा या दौऱ्याचा मुख्य हेतू असल्याचे यावेळी सांगण्यात आले. "हा दौरा प्रचारापुरता मर्यादित नसून, मोशीसोबत पुढे जाण्याचा संकल्प आहे," अशी भूमिका वसंत बोराटे यांनी व्यक्त केली.



> छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांना स्मरून मोशीतील प्रत्येक नागरिकाच्या प्रश्नांना न्याय देणे, विकासकामांना गती देणे आणि सर्वसामान्यांचा विश्वास टिकवणे हाच माझा खरा प्रचार आहे. मोशीच्या सोबत राहून, मोशीसाठीच पुढे जाण्याचा माझा ठाम संकल्प आहे.
>
> **—वसंत बोराटे,** उमेदवार, राष्ट्रवादी, प्रभाग- 2.

प्रभाग दोनमधील राजकीय वातावरण सध्या चांगलेच तापले असून, या प्रभागाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. वसंत बोराटे यांच्यासह विशाल आहेर, रूपाली आल्हाट आणि अश्विनी जाधव यांचा समावेश असलेला पॅनल अनुभवसंपन्न व जनसंपर्क असलेला मानला जात आहे. प्रचाराच्या पहिल्याच दिवशी नागरिकांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, प्रभाग दोनमध्ये या पॅनलच्या प्रचाराला चांगली सुरुवात झाल्याचे चित्र दिसून येत आहे.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

## नारळ फोडून प्रचाराचा प्रारंभ

# भोसरीतील प्रभाग 7 मध्ये राष्ट्रवादीच्या पदयात्रेला उदंड प्रतिसाद

## मिशन- PCMC : विराज लांडे यांच्यासह तीनही उमेदवारांचे जल्लोषपूर्ण स्वागत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक सातमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार विराज लांडे यांच्यासह इतर उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ रविवारी (दि. ४) मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. सँडविक कॉलनी, खंडोबामाळ आणि लांडेवाडी परिसरात नारळ फोडून प्रचाराचा प्रारंभ करत पक्षाने शक्तिप्रदर्शन केले. या निमित्ताने भोसरीतील लांडेवाडी येथील तुळजाभवानी मंदिरातून पदयात्रेला सुरुवात करण्यात आली. धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरणात सुरू झालेली ही पदयात्रा संपूर्ण प्रभागातून काढण्यात आली.**

प्रचार शुभारंभप्रसंगी भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार विलास लांडे, माजी स्थायी समिती अध्यक्ष अजित गव्हाणे, माजी महापौर मोहिनी लांडे, माजी नगरसेवक विश्‍वनाथ लांडे, सखाराम डोळस, बाळासाहेब गव्हाणे, निवृत्ती फुगे, नंदू शिंदे, निवृत्ती शिंदे, अभिमन्यू लांडगे, भानुदास फुगे, विशाल फुगे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

भोसरीतील लांडेवाडी येथील तुळजाभवानी मंदिरातून निघालेली पदयात्रा खंडोबा मंदिर, गव्हाणे वस्ती, आदिनाथनगरसह विविध भागांतून मार्गक्रमण करत पुढे गेली. रस्त्याच्या दुतर्फा उभे असलेले नागरिक, महिला, युवकांनी पदयात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले. ठिकठिकाणी घोषणाबाजी, फटाक्यांची आतषबाजी आणि नागरिकांचा उत्साह पाहता संपूर्ण प्रभागात राष्ट्रवादीमय वातावरण निर्माण झाल्याचे चित्र होते.

या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अ प्रवर्गातून विराज लांडे, ब प्रवर्गातून अनुराधा लांडगे, क प्रवर्गातून अश्विनी फुगे तर ड प्रवर्गातून अमोल डोळस हे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. चारही गटांतील उमेदवारांनी एकत्रितपणे पदयात्रेत सहभाग घेत मतदारांशी थेट संवाद साधला. स्थानिक विकास, मूलभूत सुविधा, पाणी, रस्ते, स्वच्छता आणि नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांवर भर देत प्रचार करण्यात आला. ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला असून प्रभाग सातमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विजयासाठी सज्ज असल्याचे प्रतिपादन उपस्थित मान्यवरांनी प्रचार शुभारंभाच्या माध्यमातून केले.

> “ भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार विलास लांडे, अजित गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागात नागरिकांच्या भेटीगाठी, होम टू होम प्रचार सुरू केलाच होता. रविवारी (दि. ४) प्रभाग क्रमांक ७ मधील मान्यवर ग्रामस्थ, पक्षाचे प्रमूख पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत प्रचाराचा शुभारंभ केला. माझ्यासह इतर तीनही उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ असून नागरिकांकडून उत्स्फुर्तपणे प्रेम, आशिर्वाद मिळत आहेत.
>
> **–विराज विश्वनाथ लांडे,**
> उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, प्रभाग क्रमांक ७.

## दिघीमध्ये एकतर्फी निवडणूक भाजपच्या उमेदवारांनी समतोल राखला!

## मिशन- PCMC: राष्ट्रवादीकडे तुलनेत तगडा उमेदवार नाही!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**पिंपरी-चिंचवड | निवडणुकीची तारीख अंतिम झाल्यानंतर सर्वत्र उमेदवारांची धावपळ जोरात सुरू झाली. अनेकांनी पक्ष बदलला तर काहींनी आपली निष्ठा जपत पक्षादेश मानत समाधान राखले. असेच काहीसे चित्र दिघी येथे दिसून आले. दिघी गाव महापालिकेत समाविष्ट होण्यापूर्वी येथे शिवसेनेची मजबूत पकड होती. येथे दत्तात्रय गायकवाड यांनी शिवसेना वाढवली आणि जोपासली होती. परंतु आमदार महेशदादा लांडगे यांच्यासह भारतीय जनता पक्षात प्रवेश करत दिघीमध्ये संघटना वाढविली गेली.**

दिघी-बोपखेल प्रभाग क्रमांक ४ येथे २०१७ मध्ये झालेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपचे चारही उमेदवार निवडून आलेले होते. आठ वर्षांनी ही निवडणूक होत असताना देखील राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे तगडा उमेदवार उपलब्ध झालेला नाही. यंदा भाजपने अ गटातून श्रुती विकास डोळस, ब गटातून माजी सैनिक कृष्णा भिकाजी सुरकुले, क गटातून हिराबाई नानी घुले तर ड गटातून प्रबळ नेतृत्व म्हणून उदय दत्तात्रय गायकवाड हे चार तगडे उमेदवार उभे केले आहेत.

आज कार्तिक लांडगे यांच्या हस्ते प्रचाराचा नारळ वाढवून ग्रामदैवत काळभैरवनाथ मारुती मंदिर, दिघी आणि बापुजीबुवा मंदिर, बोपखेल येथे प्रचार रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. भोसरी विधानसभेचे आमदार महेशदादा लांडगे यांच्या उपस्थितीत हा प्रचार दौरा संपन्न झाला.

अजित पवार गटाचे उमेदवार चंद्रकांत वाळके यांना संधी मिळाली असली तरी, त्यांच्या जनसंपर्क आणि विकासकामांचा अभ्यास करता उदय गायकवाड हे बाजी मारतील असे संकेत मिळाले आहेत.

पुणे शहर पर्यटन मार्गदर्शक

चंद्रकांत वाळके यांच्याच कुटुंबीयातील मातब्बर समजले जाणारे शिवसेना नेते संतोष वाळके यांनी काल दिघीतील आणि शहरातील असंख्य कार्यकर्त्यांसह प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. संतोष वाळके आणि दत्तात्रय गायकवाड यांनी या भागात शिवसेनेचे वर्चस्व राखले होते. गुरु-शिष्य नात्यातील हे दोघे आता भाजपचा प्रचार आणि प्रसार जोरदार करत आहेत. त्यामुळे अजित पवार गटाचे चंद्रकांत वाळके यांची संधी कमी झाली आहे. तथापि संधी न मिळाल्याने नाराज भाजपच्या इच्छुक उमेदवारांची नाराजी आमदार महेशदादा लांडगे यांनी दूर केली. पक्षाचा आदेश, महेशदादा लांडगे यांचा विश्वास आणि दत्तात्रय गायकवाड यांचा शब्द मानत सर्वांनी दिघी-बोपखेलमध्ये जोरदार प्रचारबाजी सुरू केली आहे. त्यामुळे यंदाही चारही उमेदवार निवडून येतील, असा ठाम विश्वास जनतेत दिसून येत आहे.

> “ आमदार महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली आमचा पॅनेल प्रगल्भ आणि सक्षम आहे. आम्ही प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या ऐकू आणि सोडवण्याचा प्रयत्न करू. यंदा प्रभागात दिलेल्या पाठिंब्याला आम्ही पूर्ण उत्तर देऊ.
>
> **—उदय दत्तात्रय गायकवाड, उमेदवार,** उमेदवार, भाजपा.